रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

वार्षिक अहवाल
२०१९ – २०२०







भारताचे संयुक्त राष्ट्रसंघातील कायम प्रतिनिधी असलेले सईद अकबरुद्दीन, तसेच यु.एन.इकोसोक आणि वॉशिंग्टन येथील आय.आर.आय. व एन.डी.आय. या संस्थांच्या प्रमुखांना भेट देताना रवींद्र साठे व रवी पोखरणा, सोबत बाला बालगुरु

स्वा. सावरकर वादविवाद स्पर्धेच्या समारोप कार्यक्रमात बोलताना प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा.अनिरुद्ध देशपांडे. शेजारी स्वाती महाळंक, ॲड. नितीन आपटे, समीरण वाळवेकर, आनंद देशमुख





महिलांसाठी योजलेल्या नेतृत्व साधना शिबिरात मार्गदर्शन करताना, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखा शर्मा. शेजारी अरविंद रेगे, निर्मलाताई आपटे व किरण माहेश्वरी

प्रस्तावना

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीस वर्ष २०१९-२० चा वार्षिक अहवाल सादर करताना अतिशय आनंद होत आहे. नेहमी प्रमाणेच यंदाही प्रबोधिनीच्या उत्तन, मुंबई, पुणे व दिल्ली कार्यालयांच्या माध्यमातून नानाविध उपक्रम योजण्यात आले. 'एकल उपयोग प्लास्टिक निर्मूलन' या विषयावरील राष्ट्रीय परिषद, केवळ महिलांसाठी झालेले नेतृत्व साधना शिबिर, योजक संस्थेच्या सहकार्याने 'वनवासी क्षेत्रातून होणारे स्थलांतर: समस्या उपाय व भविष्यातील दिशा' या विषयावर जनजाती क्षेत्रातील खासदारांसाठी झालेली परिषद आणि प्रबोधिनीच्या पुणे येथील संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्राच्यावतीने डिजिटल साहित्य निर्मिती कार्यशाळेसारखा प्रथमच झालेला अभिनव उपक्रम, हे गेल्या अहवाल वर्षातील वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम.

याशिवाय प्रबोधिनीच्या भारतीय नेतृत्व लोकशाही संस्थेच्यावतीने (आय.आय.डी.एल.) तृतीय तुकडीचा नऊ महिन्यांचा पदव्युत्तर निवासी पाठ्यक्रम, राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग व केंद्रीय संस्कृती मंत्रालयाच्या गांधी स्मृती दर्शन समिती या संस्थांबरोबर प्रबोधिनीचे झालेले सामंजस्य करार आणि प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे व कार्यकारी अधिकारी रवी पोखरणा यांचा अमेरिकेत न्यूयॉर्क येथे संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्यालय व वॉशिंग्टन येथील काही संस्थांबरोबर कार्यक्रम योजण्यासंदर्भात झालेला दौरा व तेथील प्रमुख अधिकाऱ्यांच्या भेटी, हे अहवाल वर्षातील अन्य काही विशेष.

प्रबोधिनीच्या प्रशिक्षण संकुलात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह भय्याजी जोशी, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रसाद नड्डा, संघटन महामंत्री बी.एल.संतोष व महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. प्रबोधिनीच्या कार्य अहवालाचे सविस्तर वृत्त पुढीलप्रमाणे.

अहवाल वर्षातील कार्यक्रम - संख्यात्मक वृत्त

क्र.	कार्यक्रम		कार्यक्रम	सहभागी	महिला	पुरुष
१	प्रशिक्षण	सामाजिक	२८	१२२३	३९२	८३१
		राजकीय	५	२०७	२०	१८७
२	प्रबोधन		१०	३०८७	२६३	२८२४
३	संशोधन	सर्वेक्षण	२	८५	११	७४
		निवासी पाठ्यवृत्ती	३	३	२	१
४	पुस्तक प्रकाशन		२	१०००	१३२	८६८
५	रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आंतरराष्ट्रीय कक्ष		३	४३	४	३९
६	आय.आय.डी.एल.	प्रशिक्षण	२	५०	२	४८
		सर्वेक्षण	२	५०	२	४८
		क्षेत्र भेटी व अन्य	१८	६८३	२६	६५७
७	अन्य		३	११२	१५	९७
	एकूण		७८	६५४३	८६९	५६७४

प्रबोधिनी प्रवर्तित अटल प्रतिभा पोषण केंद्र

कार्यक्रम	सहभागी	महिला	पुरुष
१०	७६६	१९९	५६७

१. विशेष कार्यक्रम :

१.१. राष्ट्रीय परिषद : ' एकल उपयोग प्लास्टिक निर्मूलन : नवभारतासाठी शक्यता व संधी '

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने, राष्ट्रीय ग्राम विकास आणि पंचायत राज संस्था आणि अखिल भारतीय प्लास्टिक उत्पादक संघ यांच्या सहकार्याने दि. १८-१९ जानेवारी २०२० या कालावधीत एका राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. प्रबोधिनीच्यावतीने गेल्या १३ वर्षांपासून प्रतीवर्षी समकालीन महत्त्वाच्या विषयांवर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन होत आहे.

प्लास्टिक, विशेषत: एकल वापर प्लास्टिक, हे आज जागतिक स्तरावर पर्यावरण, आरोग्य, सामाजिक तसेच आर्थिक क्षेत्रात एक मोठे आव्हान ठरत आहे. आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या परंतु प्रचंड समस्या ठरलेल्या, एकल वापर प्लास्टिकच्या निर्मूलनाचा सर्वंकष विचार व्हावा, आणि त्या निर्मूलनाच्या दृष्टीने प्रत्यक्ष कृतीयोग्य पावले पडावीत हा विचार परिषदेमागे होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाचा संदर्भ या परिषदेचे आयोजन करण्याला होताच. किंबहुना त्यामुळेच यंदा एकल वापर प्लास्टिक निर्मूलन हा विषय घेऊन ही परिषद प्रबोधिनीच्या केशव सृष्टी, भाईंदर येथील ज्ञान-नैपुण्य केंद्रात योजण्यात आली होती.

या परिषदेची रचना करताना सर्व पैलूंचा विचार करत पुढील विषय निश्चित करण्यात आले.

१) प्लास्टिक समस्या : पर्यावरण, आरोग्य व नागरी व्यवस्थापनावर परिणाम.
२) एकल वापर प्लास्टिक निर्मूलन : उद्देश साध्य करण्यासाठी पर्यायांचा शोध.
३) एकल वापर प्लास्टिक निर्मूलनाची दुसरी बाजू : उद्योगजगतावर व रोजगारावर संभाव्य परिणाम.
४) एकल वापर प्लास्टिक यशस्विता : या विषयातील उद्योगांच्या, सार्वजनिक क्षेत्रांच्या आणि नागरी प्रयत्नांच्या यशस्वितेची उदाहरणे.
५) आगामी दिशा : समाज, सरकार व उद्योग व्यवसायांची भूमिका

परिषदेचे उद्घाटन केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे राज्यमंत्री कैलाश चौधरी यांनी केले. पंतप्रधानांनी " सबका साथ, सबका विकास " हा नारा देत देशाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प सोडला आहे. त्याचाच एक भाग म्हणून २०२० पर्यंत देशातील एकल वापर प्लास्टिकच्या निर्मूलनाचे आवाहन यंदा त्यांनी केले आहे. या विषयाशी संबंधित सर्व घटकांनी यासाठी, सर्व पैलूंचा विचार करुन प्रयत्न करावेत असे आवाहन कैलाश चौधरी यांनी आपल्या भाषणात केले. व्यक्ति, समाज आणि पर्यायाने देश निरोगी राहण्यासाठी एकल वापर प्लास्टिक निर्मूलनासाठी बहुमुखी प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे त्यांनी विषद केले.

या उद्घाटनप्रसंगी राष्ट्रीय ग्रामविकास व पंचायत राज संस्थेचे महासंचालक डॉ. डब्लू. आर. रेड्डी, संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाचे प्रमुख प्रभज्योत सोधी, मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार गीता जैन, प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य अरविंद रेगे, महासंचालक रवींद्र साठे, कार्यकारी प्रमुख (प्रशासन व प्रकल्प) रवी पोखरणा व देखभाल विभागाचे मुख्य व्यवस्थापक उमेश मोरे व्यासपीठावर उपस्थित होते.

या परिषदेत उद्घाटन व समारोप मिळून एकूण ८ सत्रे झाली. " प्लास्टिक समस्या : पर्यावरणावर परिणाम, आरोग्य व नागरी व्यवस्थापन " या सत्रात मुंबईतील रसायन तंत्रज्ञान संस्थेचे डॉ. विजय हब्बू, बिसलरी इंटरनॅशनल प्रा. लि. चे मुख्य कार्यकारी अधिकारी अँजेले जॉर्ज व इंडियन सेंटर फॉर प्लास्टिक इन द एनवायरनमेंट तसेच स्वयंसेवी संस्थांच्या प्रकल्पाचे समन्वयक विजय मर्चंट यांनी विषयाची मांडणी केली. रसायन तंत्रज्ञान संस्थेचे माजी प्राध्यापक आणि प्लास्टिक व पेंट (रंग) विभागाचे प्रमुख द्वारकानाथ दत्तात्रय काळे या सत्राचे अध्यक्ष होते.

दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजय हब्बू होते तर बी. ए. एस. एफ. इं. लि. चे व्यवस्थापक प्रशांत लोहाडे आणि द्वारकानाथ काळे यांनी विषयाची मांडणी केली. प्लास्टिक निर्मूलनाची दुसरी बाजू अर्थात रोजगार व उद्योगांवर होणारा परिणाम या सत्राच्या अध्यक्षस्थानीही डॉ. विजय हब्बू होते तर पर्यावरण समितीचे अध्यक्ष व अखिल भारतीय प्लास्टिक उत्पादक संघाचे अध्यक्ष हितेन भेडा, आय. टी. सी. लिमिटेडचे समूहप्रमुख चित्तरंजन दार व पी. ई. टी. मार्केटिंग, रिलायन्स इंडस्ट्रिजचे उपाध्यक्ष भरत मेहता यांनी सत्रात सहभाग घेतला. खाजगी, सार्वजनिक, नागरी व इंडस्ट्री क्षेत्रातील प्लास्टिक निर्मूलन कार्यातील यशस्वी उदाहरणे सर्व प्रतिनिधींसमोर एका सत्रात ठेवण्यात आली. या सत्रात इंदोरच्या महापौर मालिनी गौर, स्वच्छचे कार्यक्रम अधिकारी सार्थक तपस्वी आणि हिंदुस्थान कोकाकोलाच्या प्लास्टिक पुनर्वापराच्या विभागाचे सहयोगी उपाध्यक्ष अजय कुमार यांनी या विषयाच्या अनुषंगाने सोदाहरण मांडणी केली. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी भोजनापूर्वी एक समांतर सत्र झाले. यांत सहभागी प्रतिनिधी पर्यावरण, सुशासन, एकल प्लास्टिक वापराला पर्याय व स्थायी विकास अशा चार गटांत विभागले होते. या सत्रांचे अध्यक्ष व वक्ते पुढीलप्रमाणे.

क्र.	गटाचे नाव	अध्यक्ष	वक्ते
१	पर्यावरण	प्रा. जगदीश जाधव	मोहम्मद जसील, सुधीर शेट्टी, डॉ. नीला कामत, प्रदीप कामत, बशिरु सचर, प्रवीण प्रभाकर, अवंतिका सिंग
२	सुशासन	प्रा. भारती छिब्बर	जगन्नाथ कश्यप, डॉ. राजेशकुमार सिन्हा, अमित देशमुख, युवराज, रोहन गुप्ता, सुधीर शेट्टी, नीलेश कुलकर्णी
३	एकल वापर प्लास्टिकला पर्याय	अर्चना चिटणीस	कपिल खांडवे, रंजन त्रिवेदी, आनंद लिमये, डॉ. दिव्या गुप्ता, प्रसाद, डॉ. हेमंत जोशी
४	स्थायी विकास	शीतलबेन शेठ	प्रदीप कामत, जयवर्धन जोशी, अंजली पंडित, डॉ. सिमी मिश्रा, आयुषी दीक्षित

समाज, सरकार व उद्योगांची भूमिका अर्थात एकल वापर प्लास्टिक निर्मूलन कार्याची आगामी दिशा या विषयावर पुढील सत्र होते. यामध्ये नालंदा विद्यापीठाच्या व्यवस्थापन शास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सपना नरुला, रुट स्कील्स व रुट सॅप्सच्या संस्थापिका भाविशा बुध्ददेव आणि पी. ई. टी. पॅकेजिंग असोसिएशनचे सरचिटणीस चंद्रमोहन गुप्ता या सत्राचे वक्ते होते.

या परिषदेचा समारोप महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी केला. या वेळी हिरानंदानी समूहाचे निरंजन हिरानंदानी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात राज्यपालांनी सांगितले की "प्लास्टिक हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनत आहे. त्यामुळे प्लास्टिक निर्मूलन ऐकायला छान असले तरी अजून योग्य पर्याय मिळालेला नाही. अर्थात गरज ही सर्वच शोधांची जननी आहे, त्यामुळे यातून आपणही पर्याय शोधू हा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर प्लास्टिक निर्मूलनामुळे रोजगारावर प्रश्नचिन्ह उठवणे योग्य नाही असेही त्यांनी आग्रहाने प्रतिपादित केले." या प्रसंगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुध्दे, व्यवस्थापन समिती सदस्या रेखा महाजन, तसेच प्रबोधिनीचे रवींद्र साठे, रवी पोखरणा व उमेश मोरे व्यासपीठावर उपस्थित होते.

देशातील १७ राज्यांतून ८४ संस्था, उद्योग क्षेत्र व अभ्यासक मिळून एकूण २०३ प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते. यात २७ महिला व १७६ पुरुषांचा समावेश होता.

१.२. अरुणाचल प्रदेश आमदार प्रशिक्षण शिबिर :

अरुणाचल प्रदेश मध्ये गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे ४२ आमदार निवडून आले. या आमदारांचे तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिर दि. १४ ते १६ जून २०१९ या कालावधीत प्रबोधिनीच्या ज्ञान-नैपुण्य केंद्रात योजण्यात आले होते. ईशान्य भारतातील एखाद्या राज्यातून मुख्यमंत्र्यासह पार्टीचे आमदार प्रबोधिनीत प्रशिक्षणासाठी आले हे पहिल्यांदाच घडले.

पार्टीची विचारधारा, लोकप्रतिनिधी या नात्याने आवश्यक असणारी विविध कौशल्ये, विधीमंडळातील कामकाजाचे प्राथमिक ज्ञान आणि संघटनात्मक कौशल्य या चार अंगांनी या प्रशिक्षणाची रचना करण्यात आली होती. भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस राम माधव, राष्ट्रीय उपाध्यक्ष खा. डॉ. विनय सहस्रबुद्धे, अरुणाचल प्रदेशाचे मुख्यमंत्री पेमा खांडू, आणि अरुणाचल प्रदेश भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष तापीर गाव यांच्या उपस्थितीत प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन झाले.

मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले की " राज्यात भारतीय जनता पार्टीचे प्रथमच सरकार स्थापन झाले आहे. म्हणून आपल्याकडून लोकांच्या खूप मोठ्या अपेक्षा आहेत. त्यामुळे आमदारांनी आवश्यक ती कौशल्ये व ज्ञान आत्मसात करुन लोकांच्या अपेक्षांना न्याय देण्याच्या दृष्टीने आपली क्षमता वाढविणे आवश्यक आहे." राम माधव यांनी भारतीय राजकारणातील भारतीय जनता पार्टीच्या योगदानाविषयी व पार्टीच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्य पध्दती विषयी भाष्य केले तर विनय सहस्रबुद्धे यांनी नैतिकता आणि मूल्यांचे राजकारणातील असलेले महत्त्व याविषयी प्रतिपादन केले.

या शिबिरात जनसंघ ते भाजपा इतिहास विकास, रा. स्व. संघ व विचार परिवार, आमदारांची भूमिका व जबाबदारी, विधीमंडळ कामकाजाचे नियम व कायदे, समूह बांधणी, नेतृत्व विकास, सरकार व पार्टी यांचे परस्पर संबंध व समन्वय, पूर्वोत्तर क्षेत्रातील भाजपाचे कार्य असे विविध विषय चर्चिले गेले.

भाजपाचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री व्ही. सतीश, डॉ. महेशचंद्र शर्मा, महाराष्ट्र भाजपाचे संघटनमंत्री विजय पुराणिक, आमदार अतुल भातखळकर, आमदार योगेश सागर, डॉ. रतन शारदा, डॉ. विक्रांत तोमर, विशाखा कुलकर्णी आणि रवींद्र साठे यांनी शिबिरात मार्गदर्शन केले.

भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय तत्कालीन संघटनमंत्री रामलाल यांच्या मार्गदर्शनाने या शिबिराचा समारोप झाला.

१.३. लोकसभा निवडणूक आणि मतदार :

मे २०१९ मध्ये १७वी लोकसभा निवडणूक झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वा खालील रालोआ सरकारने २०१४-२०१९ या काळात आर्थिक, सामाजिक व राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्यांवर जी संवेदनशील व सकारात्मक भूमिका घेतली ती मतदारांपर्यंत पोचवणे तसेच मतदारांनी निवडणुकीत अधिकाधिक संख्येत मतदान करावे असे आवाहन करण्याच्या उद्देशाने प्रबोधिनीच्या वतीने महाराष्ट्रातील काही शहरांमध्ये मतदानाच्या सुमारे महिनाभर अगोदर परिसंवाद योजण्यात आले. या परिसंवादांत राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक न्याय, आर्थिक सुधारणा व देशापुढील आव्हाने या संदर्भात मान्यवर वक्त्यांकडून मांडणी करण्यात आली.

यातील पहिला परिसंवाद ११ एप्रिल २०१९ रोजी ठाणे येथील गडकरी रंगायतनमध्ये झाला. यात सुमारे ७०० नागरिक उपस्थित होते. यात राष्ट्रीय सुरक्षा विषयाचे अभ्यासक व पत्रकार नितीन गोखले यांनी सुरक्षा विषयात केंद्र सरकारने केलेल्या महत्त्वाच्या सुधारणा, फेब्रुवारी २०१९ मध्ये पाकव्याप्त काश्मीर क्षेत्रातील बालाकोटमध्ये झालेल्या हवाई हल्ल्याच्या परिणामांची व अनेक पैलूंची मांडणी केली.

केंद्र सरकारने वंचित वर्गाच्या विकासासाठी आणलेल्या योजना व त्यातून या वर्गाला मिळत असलेला न्याय या अनुषंगाने डिक्कीचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद कांबळे यांनी उपस्थितांना माहिती दिली. आर्थिक विकासाबाबत सरकारच्या विविध योजना, नोटबंदी, आर्थिक सुधारणा आणि अशा अनेक गोष्टींच्या आधारे आर्थिक विषयाचे अभ्यासक दीपक करंजीकर यांनी सरकारच्या प्रगतीचा आलेख मांडला. प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खा. डॉ. विनय सहस्रबुध्दे परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते.

असेच परिसंवाद महाराष्ट्रात नाशिक व धुळे १२ एप्रिल २०१९ येथे योजण्यात आले होते. यात दीपक करंजीकर, नितीन गोखले व प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे, महेश दाबक यांनी विचार मांडले. नाशिक मध्ये सुमारे १२० नागरिक उपस्थित होते. तर धुळे येथील परिसंवादात प्रकाश पाठक, दीपक करंजीकर,

व हर्षल विभांडिक यांनी मार्गदर्शन केले. यात ८०० नागरिक उपस्थित होते. पुण्यात झालेल्या परिसंवादात ले. जनरल (निवृत्त) राजेंद्र निंबोरकर, दीपक करंजीकर, मिलिंद कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. यात १३० नागरिक उपस्थित होते. रत्नागिरीतील परिसंवादात ले. जनरल (निवृत्त) दत्तात्रय शेकटकर, मिलिंद कांबळे व ॲड. दीपक पटवर्धन यांचे उपस्थितांना मार्गदर्शन झाले. यात १६० नागरिक उपस्थित होते. शेवटचा परिसंवाद नवी मुंबई येथे योजण्यात आला होता. यामध्ये कर्नल अनिल आठल्ये (निवृत्त), व दीपक करंजीकर यांनी मार्गदर्शन केले. यात २०० नागरिक उपस्थित होते. तसेच प्रबोधिनीचे रवींद्र साठे व प्रा. वर्षा भोसले देखील या परिसंवादाला उपस्थित होते.

१.४. नेतृत्व साधना पर्व ११वे (महिलांसाठी) :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने देशातील व्यावसायिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या युवा वर्गासाठी सामाजिक-राजकीय नेतृत्व पाठ्यक्रमाची योजना (नेतृत्व साधना शिबिर) २०१२ पासून सुरु केली. गेल्या ९ वर्षात देशातील वेगवेगळ्या शहरांमध्ये हा उपक्रम योजण्यात आला.

यंदा अशाप्रकारचे शिबिर ४ ते ८ डिसेंबर २०१९ या कालावधीत झाले. या शिबिरासाठी केवळ महिला प्रतिनिधी अपेक्षित होत्या हे त्याचे वैशिष्ट्य. यांत १२ राज्यातील ३७ महिला प्रतिनिधी सहभागी झाल्या होत्या. या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखा शर्मा आणि भाजपा महिला मोर्चाच्या माजी राष्ट्रीय अध्यक्षा आमदार किरण माहेश्वरी यांच्या उपस्थितीत झाले तर समारोप प्रसंगी भाजपा राष्ट्रीय महिला मोर्चा अध्यक्षा व महाराष्ट्र महिला आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षा विजया रहाटकर मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

या शिबिरात एकूण १८ विषयांची मांडणी करण्यात आली. वैश्विक व भारतीय दृष्टीकोनातून महिला सक्षमीकरण या विषयाने शिबिराला प्रारंभ झाला. मग इतिहासातील नेतृत्वातून बोध, भारतीय घटना, भारतातील राजकीय पक्ष पद्धतीचा विकास, महिलांसाठीचे प्राथमिक कायदे, दैनंदिन जीवन व कार्य यांचे संतुलन अशा विषयांबरोबरच महिलांसाठीच्या विविध शासकीय योजना, महिलांसमोरील नागरी वा ग्रामीण प्रश्न अशा विषयांवर सत्रांची रचना करण्यात आली होती. या सर्वांबाबत ज्ञान मिळविणे व मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग करण्यासाठी लागणारी जनसंपर्क, भाषणकला, संवादकौशल्ये अशा विविध कौशल्यांवरही सत्रांची रचना करण्यात आली होती. या शिबिरात निर्मला आपटे, जान्हवी खांडेकर, प्रिया सावंत, दिव्या गुप्ता, निरुपमा देशपांडे, प्रा.अविनाश कोल्हे, प्रा. वनिता बंजन, ॲड.जाई वैद्य, रवींद्र गोळे, श्वेता शालिनी, मंदार भारदे, डॉ. महेश भागवत, कांता नलावडे, डॉ. राजुल पंत, डॉ. प्रवीण पाटकर, डॉ. प्रीती पाटकर, ॲड. माधवी नाईक, डॉ. स्वप्ना पाटकर यांचे मार्गदर्शन उपस्थितांना झाले. या व्यतिरिक्त मध्यप्रदेशच्या माजी मंत्री अर्चना चिटणीस यांचे एक संवादसत्र योजण्यात आले होते.

महिलांसाठी प्रथमच योजलेल्या या उपक्रमाचे सर्व प्रतिनिधींनी स्वागत केले आणि हा उपक्रम प्रतिवर्षी योजण्यात यावा अशी आग्रहाची सूचना यावेळी करण्यात केली.

१.५. नागरिकत्व सुधारणा कायदा :

प्रबोधिनीच्या वतीने दि. २२ डिसेंबर २०१९ रोजी नागरिकत्व सुधारणा कायदा - २०१९ या विषयाच्या अनुषंगाने एक दिवसीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले होते. केंद्र सरकारने डिसेंबर २०१९च्या पहिल्या आठवड्यात संसदेच्या दोन्ही सभागृहात हा कायदा मंजूर करुन घेतल्यानंतरही या कायद्याबाबत गैरसमज पसरवणे आणि त्याला मोठ्या प्रमाणावर विरोध करण्याचे काही मंडळींचे हेतुपूर्वक प्रयत्न सुरु होते. अशा वेळी या कायद्याबाबत समाजात योग्य ती जाण निर्माण व्हावी यासाठी कार्यकर्त्यांनी हा विषय व्यवस्थितपणे समजून घेण्याची आवश्यकता होती. त्यामुळेच या अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रातील सुमारे ३५० कार्यकर्ते या अभ्यासवर्गात सहभागी झाले होते. या अभ्यासवर्गाच्या उद्घाटन सत्रात खा. डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी कायद्यामागची पार्श्वभूमी सर्वांसमोर मांडली. याप्रसंगी मुंबई भाजपाचे अध्यक्ष मंगल प्रभात लोढा, आमदार अतुल भातखळकर, प्रदेश संघटनमंत्री विजयराव पुराणिक व प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे व्यासपीठावर उपस्थित होते. भाजपाचे केंद्रीय सह-संघटनमंत्री व्ही. सतीश यांनी या अभ्यासवर्गाचा समारोप केला. ॲड.राजीव पांडे यांनी या कायद्यातील तरतुदी, विशेषतः कायद्याविषयी गैरसमज निर्माण करणाऱ्या तरतुदी, त्यांच्या निराकरणासह प्रतिनिधींसमोर ठेवल्या तर आमदार अतुल भातखळकर यांनी या कायद्याचे होणारे सामाजिक व राजकीय परिणाम याविषयी विचार मांडले.

सहभागी प्रतिनिधींचे गट पाडून एका सत्रात गटशः चर्चा घडवून आणली गेली. या चर्चेमुळे प्रतिनिधींनी आगामी काळात या कायद्याच्या अनुषंगाने करावयाच्या गोष्टींबाबत स्पष्टता आली.

१.६. नवभारत (निर्माण) :

म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने समाजमाध्यमात (विशेषतः फेसबुक, ट्विटर) सकारात्मक पद्धतीने सक्रिय असणाऱ्या तरुणांचे दोन दिवसीय शिबिर दि.२१, २२ मे २०१९ रोजी योजण्यात आले होते. या दोन दिवसीय शिबिरात या तरुणांनी परस्परांशी परिचय करुन घेत एकमेकांचे अनुभव समजून घेतले. राज्यसभेचे खासदार व ज्येष्ठ पत्रकार स्वपन दास गुप्ता, जे. एन. यू. चे कुलगुरु प्रा. जगदीश कुमार, प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खा. डॉ. विनय सहस्रबुद्धे अशा दिग्गजांनी या शिबिरास भेट देऊन सहभागींशी संवाद साधला आणि त्यांचे अनुभव समजून घेतले.

माहिती तंत्रज्ञान, व्यवस्थापन, बँकिंग व अर्थ, इंजिनियरिंग आणि उद्योग क्षेत्रातील संबंधित असे देशभरातून एकूण ५४ प्रतिनिधी या शिबिरात सहभागी झाले होते.

२. प्रशिक्षण:

अहवाल वर्षात प्रशिक्षणातले जे विशेष कार्यक्रम झाले ते पुढील प्रमाणे -

२.१. राजकीय महिला कार्यकर्त्यांसाठी भाषणकला :

प्रबोधिनीच्यावतीने राजकीय क्षेत्रातील महिला कार्यकर्त्यांसाठी दि. २५, २६ ऑगस्ट २०१९ रोजी भाषणकला या विषयावर प्रशिक्षण शिबिर योजण्यात आले होते. राजकीय क्षेत्रात काम करत असताना कार्यकर्त्यांना विशेषतः लोकप्रतिनिधींना विविध विषयांवर भाषणे करावी लागतात. त्यामध्ये निवडणुका, व्याख्यानमाला, संमेलने व सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असतो. या कार्यक्रमात महिला प्रतिनिधींना भाषणासाठी अनेकदा निमंत्रित केले जाते. काही महिला प्रतिनिधींनी प्रबोधिनीकडे व्यक्त केलेली गरज लक्षात घेऊन सदर शिबिर योजण्यात आले होते. या शिबिरात देहबोली, संवाद कौशल्ये, भाषण कसे बेतावे, कसे करावे? उच्चारशास्त्र व आवाजाची जोपासना, वाचन आणि व्यासंग तसेच निवेदन व सूत्र संचालन या विषयांवर आरती सूर्यवंशी, रवींद्र साठे, माधव भांडारी, मंदार भारदे, प्रमोद पवार आणि स्वाती पाटणकर यांनी चर्चात्मक मांडणी केली. महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्षांच्या १६ महिला प्रतिनिधी यांत उपस्थित होत्या.

भाषण परिणामकारक होण्याकरिता कोणत्या गोष्टी प्राधान्याने लक्षात ठेवून तयारी केली पाहिजे, याचे मार्गदर्शन या शिबिरात करण्यात आले. भाषणाला जाण्यापूर्वी कोणत्या प्रकारचा कार्यक्रम आहे ते समजून घेऊन त्या कार्यक्रमात काय भाषण द्यायचे ते ठरविणे, ते लिहून काढणे, त्याचा सराव करणे, श्रोत्यांचा अभ्यास करणे आदी पैलूंच्या आधारे हा विषय समजावून सांगण्यात आला. या व्यतिरिक्त भाषणासाठी आवश्यक असणारी देहबोली, पेहराव, आपला व्यासंग वाढण्यासाठी आवश्यक पुस्तकाचे वाचन, भाषेवरचे प्रभुत्व, आवाजाची जोपासनेसाठी उपयोगी होणारे प्राणायाम इत्यादी विषयांची सखोल चर्चा करण्यात आली. मंदार भारदे यांनी सहभागींकडून भाषणातील प्रत्यक्षिके करून घेतली.

या शिबिराचा समारोप भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या अध्यक्षा ॲड. माधवी नाईक यांच्या हस्ते सर्व प्रतिनिधींना प्रमाणपत्र देऊन करण्यात आला.

केवळ महिलांसाठी प्रथमच झालेल्या अशा शिबिरात सहभागी प्रतिनिधींनी पुढील अभिप्राय दिले.

- राजकीय क्षेत्रात काम करताना अशा प्रशिक्षणाची गरज असून नवनवीन विषय शिकावयास मिळाले.
- येथील प्रशिक्षणाचा उपयोग आम्ही आमच्या कार्यक्षेत्रात अवश्य करुन घेऊ व इतरांनाही असे प्रशिक्षण घेण्यास प्रवृत्त करु.
- कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी निवेदन व सूत्रसंचालन किती महत्त्वाचे आहे, हे या प्रशिक्षण शिबिरातून समजले.
- भाषणासाठी वाचणे, संवाद साधणे, शब्दांवर प्रभुत्व असणे, त्याच्या जोडीला आवाजाचे महत्त्व सुध्दा याच प्रशिक्षणात कळले.

२.२. भारतीय जनता पार्टी - छत्तीसगढ़, कुरुद विधानसभा - कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर :

अजय चंद्राकर हे छत्तीसगड मधील कुरूद विधानसभेचे गेली अनेक वर्ष प्रतिनिधित्व करीत आहेत. २००४ पासून काही वर्षांचा अपवाद वगळता प्रतिवर्षी त्यांनी आपल्या मतदार संघातील तरुण कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी म्हाळगी प्रबोधिनीकडे सोपवली आहे. या योजनेप्रमाणे प्रतिवर्षी ५० कार्यकर्ते प्रबोधिनीत प्रशिक्षणासाठी येत असतात. महाराष्ट्रबाहेरील, एखाद्या राज्याने प्रबोधिनीकडे नियमितपणे कार्यकर्ते पाठवून प्रशिक्षण घडवून आणण्याचे हे आगळे-वेगळे उदाहरण आहे. या प्रशिक्षण वर्गात कार्यकर्त्यांची वैचारिक भूमिका स्पष्ट व्हावी तसेच कामाबद्दलची त्यांची जाण वाढावी आणि व्यवस्थापन कौशल्याच्या आधारे त्यांची कार्यक्षमता वाढावी अशा उद्देशाने विषयांची रचना करण्यात येते.

अहवाल वर्षात दि. २५ ते ३१ ऑगस्ट २०१९ या कालावधीत ५0 कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण प्रबोधिनीत योजण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिराचे यंदा ११ वे वर्ष होते. या मध्ये भाजपाचा इतिहास व विकास, सांस्कृतिक राष्ट्रवाद, विचार परिवार, कार्यकर्ता मनोरचना, पार्टीची पंचसूत्री, संविधान अशा विषयांबरोबरच, संवाद कौशल्य, भाषणकला, सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानाचा उपयोग अशा विविध विषयांची सत्रे योजण्यात आली होती.

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्राचे मुख्य प्रवक्ते माधव भांडारी यांनी प्रशिक्षणाचे उद्घाटन केले तर श्रीकांत भारतीय यांनी प्रशिक्षणाचा समारोप केला. यांत सुमंत घैसाल, अँड. माधवी नाईक, हरिओम शर्मा, अमरजीत मिश्रा, आर.यू. सिंग, गणेश खणकर, रवी पोखरणा, दीपक जाधव, अँड. सुभाष काळे, जितेन गजारिया, जयंत रॉय, अजित जोशी, भालचंद्र शिरसाट आणि देवेंद्र पै यांनी मार्गदर्शन केले.

२.३. राज्य मराठी विकास संस्था : कर्मचारी क्षमता विकास कार्यशाळा

राज्य मराठी विकास संस्था ही एक स्वायत्त संस्था आहे. " मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास " हे या संस्थेचे बोधवाक्य असून विविध क्षेत्रात होणारा मराठीचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा, यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे. मराठी भाषेच्या अभिवृध्दीची प्रक्रिया नियोजनपूर्वक, गतिमान व्हावी म्हणूनच या संस्थेत काम करणाऱ्या कर्मचारीवृंदास अधिक प्रोत्साहित करावे अशा उद्देशाने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या विनंतीवरून संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रबोधिनीच्या वतीने कार्यशाळा योजण्यात आली. दि. २७, २८, २९ सप्टेंबर २०१९ रोजी प्रबोधिनीच्या भाईंदर येथील ज्ञान-नैपुण्य केंद्रात हा कार्यक्रम झाला.

या कार्यशाळेत सकारात्मक दृष्टीकोन, क्षमता विकास आणि नेतृत्व व सांघिक कौशल्ये, संवाद कौशल्ये, वेळेचे व्यवस्थापन या विषयांवर आरती सूर्यवंशी व प्रिया सावंत यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचे उद्घाटन प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनी केले व राज्य मराठी विकास संस्थेचे प्रभारी संचालक डॉ. आनन्द काटीकर यांच्या हस्ते समारोप करण्यात आला. या कार्यशाळेत १३ महिला व २५ पुरुष असे एकूण ३८ जण सहभागी झाले होते.

सदर कार्यशाळेतील प्रतिनिधींच्या कार्यशाळेबद्दलच्या निवडक प्रतिक्रिया :

- आमच्यासाठी हे प्रशिक्षण नवीनच होते, या प्रशिक्षणातून आम्हाला वेळेचे नियोजन, सहकाऱ्यांमध्ये परस्परसंबंध व सांघिक भावनेने काम करण्याच्या पद्धती समजावून सांगण्यात आल्या.
- कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकासासाठी अशा कार्यशाळा नियमितपणे होत रहाव्यात.
- नकारात्मक विचार सोडून सकारात्मकतेने काम केल्यास ते जलद आणि प्रभावीपणे होऊ शकते.
- या प्रशिक्षणामुळे आपल्यातील क्षमतांचा उकल झाला. त्या क्षमतांचा माझ्या कार्यक्षेत्रात मी सहज उपयोग करुन घेऊ शकतो.
- कार्यशाळेत मिळालेल्या ज्ञानाचा व मिळालेल्या उत्तम मार्गदर्शनाचा आम्ही उपयोग करु व अशी प्रेरणा प्रबोधिनीकडून घेऊन जाऊ.

२.४. वक्तृत्वकला आणि संवादकौशल्ये :

कोणतीही कला शिकता येते, प्रत्येक कलेला शास्त्र असते, आणि त्यासाठी साधना करावी लागते. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना स्वत:च्या सर्वांगीण विकासासाठी संवादकौशल्ये महत्त्वपूर्ण असल्यामुळेच म्हाळगी प्रबोधिनी गेली २६ वर्षे हा उपक्रम नियमितपणे आयोजन करीत आहे. प्रबोधिनीचा हा एक वैशिष्टपूर्ण कार्यक्रम असून त्याला नेहमी चांगला प्रतिसाद मिळतो.

यावर्षी हे शिबिर दि. ११ व १२ जानेवारी २०२० रोजी आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन प्रसिध्द चित्रपट अभिनेते सचिन खेडेकर यांच्या शुभहस्ते झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, " अनोळखी माणसांबरोबर आपल्याला बोलता आलंच पाहिजे, आपले विचार आपलं काहीतरी म्हणणं दुसऱ्यांपर्यंत पोचवता आलं पाहिजे आणि त्यासाठी बहुश्रुत बनणं गरजेचं आहे. त्यासाठी वाचन, भाषा आणि पाठांतर आत्मसात केलं पाहिजे आणि ते संवादासाठी खूप महत्त्वाचं आहे. संवाद हा जीवनातील आवश्यक भाग आणि एक सामाजिक कौशल्य आहे."

वाचन आणि व्यासंग, निवेदन आणि सूत्रसंचालन, उच्चारशास्त्र व आवाजाची जोपासना, संवादकौशल्ये व देहबोली आणि भाषणकला या विषयांवर दिनकर गांगल, आनंद क्षेमकल्याणी, प्रमोद पवार, प्रिया सावंत आणि अजित जोशी यांनी मार्गदर्शन केले.

प्रसिद्ध वृत्त निवेदिका व समालोचक मंगला खाडिलकर यांनी शिबिराचा समारोप केला. यावेळी त्या म्हणाल्या, " यशस्वी बोलण्याचा पहिला मंत्र म्हणजे छोटी वाक्ये. उत्तम वक्ता होण्यासाठी आपली देहबोली, आपली भाषा, आपली श्रवणशक्ती, आपली बोलण्याची पध्दत त्याच्यातला प्रामाणिकपणा, आवाजातील स्पष्टता व सुसंगत वाक्यरचना अंगी बनवून घेणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर विचारांची श्रीमंती, प्रसन्न व्यक्तिमत्त्व आणि उत्कृष्ट आवाजाची जोड असायला हवी. आपण विविध विषयांवरील पुस्तके वाचली पाहिजेत. वीणा गवाणकर, सुधा मूर्ती, पु. ल. देशपांडे, अटलबिहारी वाजपेयी, शशी थरुर आणि यासारखी इतर व्यक्तिमत्त्वे आपण वाचली पाहिजेत, ऐकली पाहिजेत. साधना केली पाहिजे, ती प्रामाणिकपणे केली तरच आपल्याला प्रभावी बोलण्याची ताकद येते, आत्मविश्वास निर्माण होतो."
सदर शिबिरात महाराष्ट्राच्या १२ जिल्ह्यातून ३९ पुरुष व १२ महिला असे ५१ प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रशिक्षणाबाबत प्रतिनिधींच्या निवडक प्रतिक्रिया :

- प्रशिक्षण शिबिरात प्रतिनिधींशी संवाद साधत शब्दांची देवाण-घेवाण केल्याने विषयाची रुची वाढत गेली.
- शिंपल्यातून मोती निवडावेत तशी सर्वोत्तम वक्त्यांची निवड करण्यात आली असून त्यांना दिलेले विषय व त्या वक्त्यांची विषयाची मांडणी अप्रतिम.
- शिबिराची संकल्पना अतिशय सुंदर. विषय मांडण्याची वेगळ्या स्वरुपातील पध्दत खूपच भावली.
- कार्यक्रम संयोजन, निवेदन व सूत्र संचालन, उच्चारशास्त्र व आवाजाची जोपासना या विषयांची स्वतंत्र सत्रे व्हावीत.

२.५. प्रकल्प प्रस्ताव लेखन तंत्र :

समाजात काम करत असताना आपल्या संस्थेचे कामकाज लोकांपर्यंत पोचविण्याचे काम सामाजिक संस्था सातत्याने करत असतात. एखादा प्रकल्प समाजाभिमुख बनवण्यासाठी त्या प्रकल्पाला आर्थिक मदत करणाऱ्या संस्थेसमोर आणि ज्यांच्यासाठी हा प्रकल्प योजला जातो त्या घटकांपर्यंत प्रकल्प नीट सादर करावा लागतो. यादृष्टीने प्रकल्पाची योग्य मांडणी त्यातील विविध घटक व कार्याची दिशा या सगळ्या गोष्टी सुसंगतपणे मांडणे गरजेचे आहे.

सामाजिक संस्थांना अनेकदा विविध शासकीय, निमशासकीय वा खाजगी संस्थांच्या प्रकल्पांसाठी प्रस्ताव पाठवावा लागतो. हा प्रस्ताव योग्य व शास्त्रीय पद्धतीने लिहिला गेल्यास संस्थेला त्यादृष्टीने काम करण्याची संधी मिळण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळेच दि. २२, २३ जून २०१९ रोजी प्रकल्प प्रस्ताव लेखन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रशिक्षण शिबिराला महाराष्ट्रातील १० जिल्ह्यातील १७ संस्थांचे २४ प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये १० महिला व १४ पुरुष यांचा समावेश होता.

प्रकल्प अहवाल लेखन का व कशासाठी? संस्था पातळीवर प्रकल्प अहवालाची करावयाची पूर्वतयारी, प्रत्यक्ष अहवाल लेखन कसे करावे? आणि प्रकल्पाचे दस्तावेजीकरण, व्यावसायिक संस्थांचे सामाजिक दायित्व (सी. एस. आर.) व इतर दात्यांच्या अपेक्षा अशा विषयांवर त्या त्या क्षेत्रातील मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या शिबिरात रेणू सोमण, विवेक अत्रे यांनी मार्गदर्शन केले.

या शिबिराचा समारोप प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य अरविंद रेगे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला व त्यांच्या हस्ते सर्व प्रतिनिधींना प्रमाणपत्रे देण्यात आली.

२.६. माहिती अधिकार कायदा-दिशादर्शन कार्यशाळा :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने वनवासी कल्याण आश्रम या संघटनेच्या महाराष्ट्रातील प्रमुख कार्यकर्त्यांसाठी माहिती अधिकार कायदा या विषयावर दिशादर्शन कार्यशाळा योजण्यात आली होती. रविवार, दि. ३० जून २०१९ रोजी प्रभादेवी येथील यशवंत भवन येथे झालेल्या या कार्यशाळेत सुमारे २६ प्रमुख कार्यकर्ते सहभागी झाले होते. वनवासी कल्याण आश्रमाचे केंद्रीय अधिकारी गिरीश कुबेर आणि प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांच्या प्रमुख उपस्थित कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

माहिती अधिकार कायदा येण्यामागची पार्श्वभूमी, त्याचा वापर करण्याची पध्दती, मुदत, कोणत्या क्षेत्राला लागू होतो या अनुषंगाने ज्येष्ठ विधीज्ञ गणेश सोवनी यांनी मांडणी केले. वयम् या वनवासी क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थेचे कार्यकर्ते रामदास बरफ यांनी या कायद्याच्या व्यावहारिक उपयोगितेविषयी मार्गदर्शन केले.

माहिती अधिकार कायदा या विषयात सक्रिय असलेले कार्यकर्ते नैनेश डोळस यांनी सर्व सहभागींना प्रत्यक्ष प्रपत्र कसे भरावयाचे याचे कृती सत्रातून मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचा प्रत्यक्ष वनवासी क्षेत्रात काम करत असणाऱ्या कार्यकर्त्यांना खूप उपयोग होणार आहे, असाच सर्व सहभागींचा अभिप्राय होता.



प्रशिक्षणातील विशेष कार्यक्रमांच्या वृत्ताव्यतिरिक्त अन्य झालेल्या प्रशिक्षणाची सूची

क्र.	दिनांक	कार्यक्रमाचे नाव	ठिकाण	संख्या			मार्गदर्शक
				पुरुष	महिला	एकूण	
१	१८ मे २०१९	निवेदन व सूत्रसंचालन प्रशिक्षण शिबिर	चंचल स्मृती	२६	९	३५	शिबानी जोशी, नरेंद्र बेडेकर
२	१३-१४ जुलै २०१९	के.जे.सोमय्या महाविद्यालय प्रशिक्षण शिबिर	ज्ञान-नैपुण्य केंद्र	२२	१८	४०	अरविंद रेगे, डॉ.हेमांगी भागवत, डॉ.मीना शिलेदार, डॉ.हरीश शेट्टी, इका बॅनर्जी
३	३-४ ऑगस्ट २०१९	महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, विभागीय कार्यालय, ठाणे, पदाधिकारी व कर्मचारी क्षमता विकास कार्यशाळा	ज्ञान-नैपुण्य केंद्र	१२	१४	२६	अरविंद रेगे, माधवी सुर्वे, अनिल पाटील, डॉ.मीना शिलेदार, स्वाती पाटणकर, आरती सूर्यवंशी, आनंद क्षेमकल्याणी, मनीषा क्षेमकल्याणी
४	२३-२४ सप्टेंबर २०१९	आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, बदलापूर - शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम	ज्ञान-नैपुण्य केंद्र	१४	१८	३२	अरविंद रेगे, डॉ.अरुणा कौलगुड, डॉ.शेखर चंद्रात्रे, डॉ. महेश भागवत, प्रिया सावंत
५	२३-२४ नोव्हेंबर २०१९	गोवंडी एज्युकेशन सोसायटी: शिक्षक प्रशिक्षण शिबिर	चंचल स्मृती	-	-	२०	डॉ. राहूल दहातोंडे, प्रिया सावंत, फ्रान्सेस वैद्य, रेनी फ्रान्सिक, अरविंद रेगे
६	३० नोव्हेंबर २०१९	नगिनदास खांडवाला महाविद्यालय, कर्मचारी क्षमता विकास प्रशिक्षण	ज्ञान-नैपुण्य केंद्र	-	-	३५	डॉ. ॲन्सी जोश, प्रिया सावंत, आरती सूर्यवंशी
७	३१ जानेवारी १ फेब्रुवारी २०१९	मुंबई विद्यापीठ: प्रशासकीय अधिकारी प्रशिक्षण शिबिर	ज्ञान-नैपुण्य केंद्र	२३	७	३०	डॉ.दिनेश कांबळे, डॉ.राजपाल हांडे, शिवाजी गावडे, नारायण राजाध्यक्ष, रवींद्र साठे
८	२८-२९ जून २०१९	जनकल्याण सहकारी पतसंस्थेच्या अधिका-यांसाठी कार्यशाळा,	कराड	-	-	१६	डॉ. अरुणा कौलगुड, श्रीमती यशोधरा भालेराव
९	२७-२८ जुलै २०१९	खासदारांसाठी कार्यशाळा	ज्ञान-नैपुण्य केंद्र	११	१	१२	डॉ. एम. के. श्रीधर

३. प्रबोधन

३.१. स्वा. सावरकर स्मृती आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि सावरकर दर्शन प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २२ सप्टेंबर २०१९ रोजी पुणे येथील स्वातंत्र्यवीर स्मारक व अध्यासन केंद्रामध्ये स्वा. सावरकर स्मृती आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा घेण्यात आली.

"एक देश : एक निवडणूक ही भारताच्या राजकीय व्यवस्थेतील क्रांतिकारी सुधारणा ठरेल." हा यंदाच्या स्पर्धेचा विषय होता. स्पर्धेचे हे १४ वे वर्ष होते. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील २० महाविद्यालयांमधून ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. सदर स्पर्धेसाठी माध्यमतज्ज्ञ डॉ. समीरण वाळवेकर, निवेदक आनंद देशमुख, कायदेतज्ज्ञ ॲड. नितीन आपटे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी व प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे यांनी सांघिक विजेतेपद तर पुण्यातीलच फर्ग्युसन महाविद्यालयाने सांघिक उपविजेतेपद पटकाविले. वैयक्तिक पुरस्कारांमध्ये प्रथम क्रमांक सोमेश बाम, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे; द्वितीय क्रमांक अमोल मसलखांब, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे; आणि तृतीय क्रमांक श्रध्दा जठार, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे यांना मिळाला तर उत्तेजनार्थ पारितोषिक गौरी महाजन, मराठवाडा मित्र मंडळ विधी महाविद्यालय, पुणे यांनी प्राप्त केले.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या युवकांना स्वत:चे विचार प्रभावीपणे मांडता आले पाहिजेत, त्यासाठी चौफेर वाचनची आवश्यकता आहे असे विचार म्हाळगी प्रबोधिनीचे अध्यक्ष प्राचार्य अनिरुध्द देशपांडे यांनी समारोप व पुरस्कार वितरण समारंभात मांडले. प्रबोधिनीच्या पुणे कार्यालयाच्या प्रमुख स्वाती महाळंक यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन केले.

३.२. वनवासी खासदारांची परिषद :

'वनवासी क्षेत्रातून होणारे स्थलांतर : समस्या, उपाय व भविष्यातील दिशा' या विषयावर वनवासी खासदारांची एक परिषद दि. १५, १६ जानेवारी २०२० या कालावधीत योजण्यात आली होती. पुण्यातील योजक संस्थेच्या सहयोगाने योजण्यात आलेल्या या परिषदेचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी पारंपरिक ज्ञान, वैधानिक प्रयत्न आणि खासदारांनी स्वानुभवाचा उपयोग करत या स्थलांतर समस्येवर उपाय शोधण्याची आवश्यकता प्रतिपादित केली. खासदारांनी, विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे अंमलात आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करुन अधिकाधिक वनवासींना लाभ मिळवून द्यावा, अंत्योदय अर्थात शेवटच्या व्यक्तीचा

उत्कर्ष हेच आपले साध्य मानून, समाजाच्या सामूहिक प्रयत्नांसाठीही आपण व्यवस्थित प्रयत्न करण्याची आवश्यकता त्यांनी बोलून दाखवली. अशा प्रकारच्या परिषदा राज्य पातळीवरही योजण्यात आल्या पाहिजेत असे त्यांनी आग्रहपूर्वक आवाहन केले.

योजक संस्थेचे अध्यक्ष डॉ. गजानन डांगे यांनी परिषदेचे बीजभाषण केले. आपल्याकडील माहिती व नकाशांच्या आधारे नैसर्गिक स्रोतांचे होत असलेले अवमूल्यन, निसर्गात होत असलेले बदल, शेती उत्पादकता आणि यांतून होणाऱ्या परिस्थितीमुळे वनवासी क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतीय तत्त्वज्ञानात विकासाची मांडलेली रचना, समाजाचा व्यापक सहभाग, मानसिकतेत बदल या गोष्टींच्या आधारे या प्रश्नांची उकल करता येईल असे ते म्हणाले. या परिषदेत विविध विषयांवर मांडणी व त्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. हे विषय पुढीलप्रमाणे :

- स्थायी कृषी उत्पादकता : स्थलांतराला आळा.
- जल व्यवस्थापन व संवर्धन. (जीवनमान सुरक्षा)
- वन संवर्धन व व्यवस्थापन. (जीवनमान सुरक्षा)
- वनवासी जीवनावर परिणाम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय बाबी आणि स्थलांतर रोखण्याचे संस्थात्मक मार्ग.

या परिषदेत वनवासी समाजाच्या होणाऱ्या स्थलांतराचा व्यापक अर्थाने व विविध पैलूंनी विचार झाला. विविध योजना, वनवासींच्या कला, नैसर्गिक आपत्ती, वन कायदा उपयोग अशा वेगवेगळ्या गोष्टींचा उहापोह होत एका मुक्त सत्रात काही उपाय देखील सुचविले गेले.

या परिषदेस नाबार्ड, क्रीडा, पलायन आयोग, उत्तराखंड, शिवगंगा अभियान, बारीपाडा, प्रायमूव्ह कन्सल्टंटस् प्रा. लि. अशा विविध संस्थांचे तज्ज्ञ उपस्थित राहिले व त्यांनी विविध सत्रांमधून विषयाची मांडणी केली. डॉ. जी. रवींद्र चारी, डॉ. जी. एच. व्ही रत्ना बाबू (महाव्यवस्थापक, नाबार्ड), राजेंद्र दहातोंडे (मुख्य शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र), हर्ष चौहान (सदस्य, वनवासी कल्याण आश्रम), चैत्रामजी पवार, (अध्यक्ष, वनवासी कल्याण आश्रम, देवगिरी प्रांत), नीलेश कुलकर्णी, (संचालक, प्रायमूव्ह इन्फ्रा डेव्ह. कन्स. प्रा. लि.), गुमानसिंह दामोह, (खासदार, रतलाम, मध्य प्रदेश), खा. डॉ. विनय सहस्रबुद्धे, (उपाध्यक्ष, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी), डॉ. योगेश गोखले, (ज्येष्ठ अधिकारी, टेरी), रमेशचंद्र मीना, (अध्यक्ष, ट्रायफेड), डॉ. नवलजीत कपूर, (आय. ए. एस., सचिव, आदिवासी मंत्रालय), डॉ. एन. बी. ब्रिंदावनम, डॉ. सचिन चतुर्वेदी, (महासंचालक, परराष्ट्र विभाग, भारत सरकार), डॉ. शरद नेगी, (उपाध्यक्ष, पलायन आयोग, उत्तराखंड), आदी खासदारांनी चर्चेत भाग घेतला. पुरूषोत्तम रुपाला व अर्जुन मुंडा हे दोन केंद्रीय मंत्रीही चर्चेत सहभागी झाले. भाजपाचे संघटन महामंत्री बी.एल.संतोष यांनीही प्रतिनिधीना मार्गदर्शन केले.

या परिषदेचा समारोप रा. स्व. संघाचे सरकार्यवाह भय्याजी जोशी यांच्या मार्गदर्शनाने झाला. कृषी उत्पादने, शेती आणि वन उत्पादने व प्रक्रिया याचबरोबर वनवासी कला यातून त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने सर्वांनी विचार व प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांनी सांगितले. वनवासी बांधवांनी आपणास त्यांचा प्रतिनिधी म्हणून निवडून दिले आहे, ते केवळ तुमच्यावरील विश्वासामुळे आणि म्हणूनच या विश्वासाला पात्र होणारी कृती तुम्हा सर्वांकडून अपेक्षित आहे. त्याचबरोबर पलायन या शब्दाऐवजी स्थलांतर हा शब्द वापरावा असा आग्रह त्यांनी सर्वांना केला. वनवासी समाजाच्या क्षमता संवर्धनासाठी प्रशिक्षण संस्था सक्षम करणे गरजेचे आहे. या संस्थांच्या माध्यमातून वनवासी समाजात आत्मविश्वास निर्माण करणे आवश्यक आहे असेही ते म्हणाले.

या परिषदेतील विषयांना योग्य पद्धतीने समाजात नेत समाजात सुयोग्य परिवर्तन कसे आणता येईल याचाही खासदारांनी विचार करण्याची आवश्यकता आहे, असे भय्याजींनी प्रतिपादन केले. परिषदेत विविध राज्यातील एकूण ४५ प्रतिनिधी सहभागी झाले होते.

३.३. महाराष्ट्रातील दुष्काळ आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिका : चर्चा बैठक

म्हाळगी प्रबोधिनीने मराठवाडा युवक विकास मंडळ यांच्या सहकार्याने रविवार दि.२ जून २०१९ रोजी महाराष्ट्रातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एक दिवसीय चर्चा बैठक औरंगाबाद येथे योजली होती. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीवर कार्य करत असणाऱ्या सुमारे ४० संस्थांचे ७० प्रतिनिधी या चर्चा बैठकीस उपस्थित होते.

या चर्चा बैठकीस राज्याचे तत्कालीन महसूल मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील उद्घाटन प्रसंगी उपस्थित होते. त्यांनी राज्यातील व विशेषतः मराठवाडयातील दुष्काळी परिस्थितीचे चित्र उपस्थित प्रतिनिधींसमोर मांडले. स्वयंसेवी संस्था व राज्य सरकार करत असलेल्या विविध उपायांचा तपशील त्यांनी सर्वांसमोर ठेवला. तसेच पाऊस पडल्यावर प्राधान्याने वरिष्ठ महाविद्यालयीन मुलींच्या शिक्षणाकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत कार्य करण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादित केली. प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खा.डॉ विनय सहस्रबुद्धे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

काही संस्थांनी दुष्काळग्रस्त भागात त्यांच्यामार्फत सुरु असलेल्या कार्याची सादरीकरणे केली. या दिवसभराच्या बैठकीला मराठवाड्यातील ज्येष्ठ पत्रकार संजीव उन्हाळे यांचेसह महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्थांचे ६० प्रतिनिधी उपस्थित होते. या चर्चा बैठकीचा समारोप प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनी केला.

३.४. गुरुवार सभा :

प्रबोधिनीच्या वतीने गेली २१ वर्षे गुरूवार सभा हा उपक्रम नियमितपणे सुरू आहे. दर महिन्याच्या शेवटच्या गुरूवारी प्रबोधिनीच्या वडाळा, मुंबई येथील चंचल कार्यालयात होणाऱ्या या उपक्रमात अभ्यासकांकडून विविध विषयांवर मांडणी करण्यात येते. महत्त्वाच्या राष्ट्रीय, राजकीय व सामाजिक विषयावर अभ्यासकांचे व तज्ज्ञांचे व्याख्यान योजण्यात येते.

अहवाल वर्षात झालेल्या गुरूवार सभेचा तपशील खालीलप्रमाणे :

क्र.	दिनांक	विषय	उपस्थिती	वक्ता
१	२४ एप्रिल २०१९	आर्थिक विकासातून न्याय	१५	संजय पानसे
२	२५ जुलै २०१९	अनुच्छेद ३७० व ३५अ : वास्तव आणि उपाय	३५	ॲड.उदय वारुंजीकर
३	२८ नोव्हेंबर २०१९	अयोध्या निकालाचा अन्वयार्थ	९	ॲड.सुजय जोशी
४	३० जानेवारी २०२०	राष्ट्रापुढील प्रश्न आणि विद्यार्थी चळवळ	१५	मिलिंद मराठे
५	२७ फेब्रुवारी २०२०	स्वा.सावरकर आणि भाषा शुद्धी	१५	अरविंद कुळकर्णी
			८९	

४. संशोधन व सरकारी प्रकल्प:

४.१. बाल शोषण व लैंगिक अत्याचार या अनुषंगाने राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने मान्यता दिलेल्या आश्रमशाळा व नवोदय विद्यालयांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणातून काढलेल्या निष्कर्षांचा अहवाल राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाला मार्च २०२० मध्ये सादर करण्यात आला.

४.२. रुपे कार्डाच्या उपयोगितेसाठी प्रबोधिनीने बिहारमधील २६४२ तर उत्तर प्रदेशातील २५०० कार्डधारकांचे सर्वेक्षण केले. नाबार्डने आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने सुरु केलेल्या रुपे कार्डाचा नेमका किती प्रमाणात उपयोग केला जातो आहे, हे जाणून घेण्यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले, या सर्वेक्षणाचा अहवाल नाबार्डला सादर करण्यात आला. प्रबोधिनी व सोलेस संस्थेच्या आदर्श कटरुगा यांनी संयुक्तपणे हा शोध प्रकल्प पूर्ण केला.

४.३. केंद्रीय सार्वजनिक उद्योगांच्या सी. एस. आर. अंतर्गत भारत हेवी इलेक्ट्रीकल्स लि. या कंपनीने प्रबोधिनीला आशा वर्कर्सच्या क्षमता विकासासाठी निधी उपलब्ध करुन दिला. या योजनेअंतर्गत महाराष्ट्राच्या ठाणे जिल्ह्यातील कल्याण विद्युत क्षेत्रातील आशा वर्कर्सचे क्षमता विकासाचे उपक्रम प्रबोधिनीच्या वतीने योजण्यात आले होते. दि.१९ जुलै २०१९ रोजी आशा वर्कर्ससाठी एक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात मोरोशी येथे झालेल्या या वर्गात एकूण २७ जण सहभागी झाले होते.

४.४. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि गांधी स्मृती दर्शन समिती यांच्यात मार्च २०२० मध्ये एक सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार दोन्ही संस्थांच्यावतीने पुढील काळात प्रशिक्षण, प्रबोधन आणि संशोधनात्मक उपक्रम संयुक्तपणे योजले जातील.

४.५. प्रबोधिनीने राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने अभ्यास करण्यासाठी मंजुरी प्राप्त केली आहे. भ्रमणध्वनी व त्यातही आंतरजाल सोययुक्त भ्रमणध्वनीचे मुलांवर शारीरिक, मानसिक तसेच व्यवहारात (वर्तमान) होणारे परिणाम या अनुषंगाने हा अभ्यास २०२०-२१ या वर्षात केला जाणार आहे.

४.६. राष्ट्रीय समाजशास्त्र व संशोधन परिषदेने (ICSSR) प्रबोधिनीच्या 'लोकशाही शासन' या नियतकालिकासाठी तसेच या संदर्भात संशोधन करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे.

४.७. पं. दीनदयाळ उपाध्याय संग्रहालय :

ऑक्टोबर २०१८ मध्ये पं. दीनदयाळ उपाध्याय संग्रहालयाचे भूमीपूजन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनराव भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. सरकार्यवाह भय्याजी जोशी, सहसरकार्यवाह डॉ. कृष्ण गोपाल व केंद्रीय सांस्कृतिक मंत्री डॉ. महेश शर्मा हे ही यावेळी उपस्थित होते. केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे या संग्रहालयाच्या निर्मितीसाठी अनुदान मिळाले आहे.

पं. दीनदयाळ उपाध्याय संग्रहालयाचे दोन मजल्याचे काम पूर्ण झाले असून येत्या काही महिन्यात इमारतीचे बांधकाम पूर्ण होईल. या संग्रहालयात पं. दीनदयाळ उपाध्याय यांची सुंदर मूर्ती, प्रतिमा, त्यांच्या जीवनातील प्रसंग दर्शविणारी चित्रे, छायाचित्रे, चलचित्रे इत्यादीचा समावेश असून त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात येणार आहे.

संकुलात वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये सहभागी होणारे कार्यकर्ते तसेच संकुलास भेट देणाऱ्या व्यक्तींना या संग्रहालयाद्वारे पं.दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनकार्याविषयी माहिती उपलब्ध होणार आहे. दिल्ली येथील सुप्रसिध्द क्युरेटर मासुमा रिझवी, वास्तुविद्याविशारद आरिफ नुराणी, प्रसिध्द चित्रकार वासुदेव कामत व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार श्रीपाद जोशी यांच्या सहकार्याने एक उत्तम संग्रहालय निर्माण करण्याचा प्रबोधिनीचा प्रयत्न आहे.

४.८. निवासी संशोधन पाठ्यवृत्ती :

कार्यकर्त्यांची संशोधन वृत्ती वाढीस लागावी, त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि महत्त्वाच्या विषयांवर अभ्यासपूर्ण संशोधन व्हावे म्हणून प्रबोधिनीच्या वतीने अभ्यासू कार्यकर्त्यांना ही पाठ्यवृत्ती दिली जाते. यासाठी यंदाच्या वर्षी स्मिता वायंगणकर, डॉ. नलिन मेहता आणि अथर्व अत्रे यांनी या योजनेचा लाभ घेतला.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासकेंद्र ग्रंथालय

काळाच्या बदलत्या प्रवाहात वाचन- साहित्य आणि संसाधने यांचे स्वरुप बदलत गेले आहे. या बदलत्या, वाढत्या स्वरूपातील मागणी आणि वापरामुळे ग्रंथालयाच्या कार्यपध्दतीत आणि स्वरुपातसुध्दा मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. बदलता काळ आणि वाढते तंत्रज्ञान यामुळे जगात अनेक क्षेत्रात झालेला बदल आपल्या लक्षात येईल. ग्रंथालयेसुध्दा यापासून वंचित राहिलेली नाहीत. ग्रंथालय आणि त्यांचे वाचनसाहित्य यामध्ये आमूलाग्र बदल करत, वाचनसंस्कृतीचे वर्धन करण्याचे महत्त्वाचे काम गेली २६ वर्षे प्रबोधिनीचे हे ग्रंथालय करत आहे.

प्रबोधिनीचे हे ग्रंथालय शासनमान्य (महाराष्ट्र राज्य) असून या ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. इथले सर्व व्यवहार हे संगणकामार्फत केले जातात.

या ग्रंथालयाकडे विपुल ग्रंथसंपदा, विविध विषयांवरील पुस्तिका, विविध विषयांवरील वृत्तपत्रीय काञणे उपलब्ध आहेत. महाराष्ट्राबाहेरील अभ्यासक, वाचकही या ग्रंथालयाचा लाभ घेत असतात. ग्रंथालयात मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांतील ग्रंथांचा समावेश आहे.

ग्रंथालयातील साहित्याची सद्यस्थिती खालीलप्रमाणे :

क्र.	ग्रंथालयीन साहित्य प्रकार	नोंद साहित्य
१	ग्रंथ (मराठी, हिंदी व इंग्रजी)	१६४३३
२	पुस्तिका (विवध विषयांवरील संदर्भ पुस्तिका)	३६२९
३	दुर्मिळ वृत्तपत्रीय कात्रणे	९००००
४	ध्वनिफिती	७०९
५	चित्रफिती	२२७
६	सीडीज	७५२
७	दुर्मिळ वृत्तपत्रे	६३
८	नकाशे	१३
९	नियतकालिके	१११०

अहवाल वर्षात ग्रंथालयातर्फे ७ प्रबोधनात्मक, १ कार्यशाळा व ८ इतर असे १६ सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले गेले. यात ग्रंथालय कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळा, ग्रंथ प्रकाशन, वाचन प्रेरणा दिन, वृक्ष लागवड, मराठी राजभाषा दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, स्वा. सावरकर जयंती व ग्रंथ प्रदर्शन इत्यादी उपक्रमांचा समावेश होता. सदर उपक्रमात जगन्नाथ पाटील, वीणा गवाणकर, अरविंद कुळकर्णी, डॉ. महेश भागवत, व रवींद्र साठे यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली.

अनेक अत्याधुनिक सेवा-सुविधा असलेल्या या ग्रंथालयाला गेल्या वर्षी अनेक सन्माननीय व्यक्तींनी ग्रंथभेटी दिल्या आहेत. या सन्माननीय व्यक्तींमध्ये उदयप्रताप सिंह (वाराणसी), रमेश वरखेडे व विनायक गोविलकर (नाशिक), नितीन वैद्य (सोलापूर), वैजयंती गुप्ते, (गांधीनगर, गुजरात), दिलीप चावरे, सारंग दर्शने, राजा अभ्यंकर, ज्योत्स्ना कोल्हटकर (सातारा), मिलिंद जोशी यांचा समावेश आहे.

५.१. ग्रंथालयीन कर्मचा-यांसाठी कार्यशाळा : संवाद स्वत:शी व वाचकांशी :

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान अनन्यसाधारण आहे. सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी वृंदाच्या सहभागातून ग्रंथालये अधिक वाचककेंद्रित, अत्याधुनिक व्हावीत, या उद्देशाने दि. २८ जून २०१९ रोजी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

बदलत्या काळानुरुप ग्रंथालयीन वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन, ग्रंथालयात येणारे वाचक व इतर अभ्यासक यांना उत्तम दर्जाची सेवा देता यावी, स्वत:चेही व्यक्तिमत्त्व संवर्धन व्हावे आणि संवाद कौशल्याचा योग्य प्रकारे उपयोग करून ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी आपले काम जास्तीत जास्त प्रभावीपणे करावे, ग्रंथालयातर्फे वेगवेगळे उपक्रम राबवून वाचकवर्ग कसा वाढविता येईल या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आरती सूर्यवंशी यांच्या शुभहस्ते या कार्यशाळेचे उदघाटन करण्यात आले. या कार्यशाळेला महाराष्ट्रातील २६ सार्वजनिक ग्रंथालयातील २८ महिला व पुरुष कर्मचारी उपस्थित होते. कार्यशाळेत एकूण चार विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. मीना शिलेदार, डॉ. सुषमा पौडवाल, आणि डॉ. अंजली कीर्तने या तज्ज्ञ व्यक्तींनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेसाठी निवडलेले विषय उत्तम होतेच, परंतु ते मांडणारे तज्ज्ञही आपापल्या विषयात पारंगत होते. कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकासासाठी अशा कार्यशाळा वेळोवेळी आयोजित करण्यात याव्यात, कार्यशाळेत घेतलेले विषय अत्यंत महत्त्वाचे होते, उत्तम असे विशेष मार्गदर्शन कार्यशाळेत मिळाले अशा प्रतिक्रिया सहभागींनी नोंदविल्या.

समारोप सत्रात श्याम जोशी व दिलीप नवेले यांनी कार्यशाळेविषयी अभिप्राय जाणून घेतले व सर्व प्रतिनिधींना प्रमाणपत्र देऊन ही कार्यशाळा संपन्न झाली.

५.२. अल्गोरिदम कंसल्टंन्ट प्रा. लि. : 'स्लिम' एकत्रीकरण २०१९

अल्गोरिदम कंसल्टंन्ट ही आस्थापना ग्रंथालयीन क्षेत्रात काम करत असून ग्रंथालयाचे सॉफ्टवेअर तयार करण्याचे काम करत आहे. 'स्लिम सॉफ्टवेअर' या नावाने ती कार्यरत आहे.

ही आस्थापना देशभरातील सार्वजनिक ग्रंथालये, विद्यालयीन, महाविद्यालयीन ग्रंथालयांसाठी 'स्लिम सॉफ्टवेअर' या नावाने सेवा देत असते. या आस्थापनेचे संचालक मधुसूदन गायकैवारी असून, दरवर्षी जी ग्रंथालये या सॉफ्टवेअरची सेवा घेत असतात, त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी एक एकत्रीकरणाचा कार्यक्रमही करत असते. त्याचबरोबर या आस्थापनेद्वारे सर्वोत्तम ग्राहक पुरस्कार ही देत असते. यावर्षी हे एकत्रीकरण प्रबोधिनीच्या ज्ञान-नैपुण्य केंद्रात दि. २२ नोव्हेंबर २०१९ रोजी आयोजित करण्यात आले होते. देशभरातून हे सॉफ्टवेअर वापरणाऱ्या ४५ आस्थापनातील ग्रंथालयांनी भाग घेतला होता. एकूण ६५ ग्रंथालयीन कर्मचारी उपस्थित होते.

अल्गोरिदमचे संचालक मधुसूदन गायकैवारी यांनी हे सॉफ्टवेअर वापरत असलेल्या आस्थापनांतील कर्मचाऱ्यांच्या या सॉफ्टवेअरबद्दलच्या अडीअडचणींचे निरसन केले व मार्गदर्शनही केले. यावेळी मेधा तासकर, आशुतोष जोशी तसेच प्रबोधिनीच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल दिलीप नवेलेही उपस्थित होते.

शेवटी अल्गोरिदमचे संचालक मधुसूदन गायकैवारी यांचे हस्ते सदर पुरस्कार देण्यात आले. प्रबोधिनीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयासही या पुरस्कारने सन्मानित करण्यात आले.

५.३. स्वा. सावरकर हयात असते तर.....

स्वा. सावरकर यांच्या जयंती निमित्त (दि.२८ मे) महेश भागवत यांचे भाषण योजण्यात आले होते. ते आपल्या भाषणात म्हणाले की, "सावरकरांच्या परखड व सुस्पष्ट वक्तव्यांबद्दल आपण अपराधित्व बाळगण्याचे काहीच कारण नाही. भारतवर्षात राहणाऱ्या सर्वांना आपल्याबरोबर घेऊन आपण मार्गक्रमण करायचे आहे. म्हणूनच आपण सर्वजण भारतीय आहोत हाच भाव सदैव जागवायचा आहे हे वेगळे सांगण्याची गरज वाटत नाही. स्वा. सावरकरांनी जन्मभर जी स्वप्ने बघितली, जे ध्यास घेतले, ती स्वप्ने आणि ते ध्यास वर्तमानकाळात पूर्ण होत आहेत. सावरकर एक द्रष्टा महापुरुष होते, अचूक भविष्य चिंतन करणारे होते. आपल्या भारतभूमीत न्यायाचे, मानवतेचे नंदनवन फुलावे, बहरावे, कालबाह्य रुढींना सर्वार्थाने पूर्णविराम मिळावा, या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हा महामानव जीवनभर झिजला व झुंजला." यावेळी ५० श्रोते उपस्थित होते.

६. पुस्तक प्रकाशन :

प्रबोधिनीने जनप्रबोधनाचा भाग म्हणून आपला स्वतंत्र प्रकाशन विभाग विकसित केला आहे. सामाजिक व राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या विषयांवर प्रबोधिनीतर्फे प्रकाशन करण्यात येते. यावर्षी पुढील दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या प्रकाशनासह प्रबोधिनीची आता ८६ पुस्तके व पुस्तिका प्रकाशित झाल्या आहेत.

६.१. नागरिकत्व सुधारणा कायदा – २०१९ : भ्रम आणि वास्तव

भाजपाचे अभ्यासू आमदार अतुल भातखळकर यांनी लिहिलेल्या ' नागरिकत्व सुधारणा कायदा – २०१९ : भ्रम आणि वास्तव ' या पुस्तिकेचे प्रकाशन फेब्रुवारी २०२० मध्ये मुंबई येथे करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने डिसेंबर २०१९ मध्ये संसदेच्या दोन्ही सभागृहांत नागरिकत्व सुधारणा विधेयक बहुमताने संमत केले. भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी १२ डिसेंबर २०१९ रोजी त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर ते विधेयक कायदा स्वरूपात पुढे आले.

पाकिस्तान, बांग्लादेश व अफगाणिस्तान या देशांमधून धार्मिक अत्याचारांमुळे पीडित होऊन भारतात आलेल्या लक्षावधी शरणार्थींच्या जीवनात या कायद्यामुळे आशेचा एक किरण निर्माण झाला. सन्मानपूर्वक जीवन जगण्याची संधी त्यांना उपलब्ध झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्या नेतृत्वाखालील सरकारने नागरिकता सुधारणा कायदा आणून एक ऐतिहासिक क्रांतिकारी निर्णय घेतला.

परंतु या कायद्याच्या विरोधात अपप्रचार व गैरसमज पसरविण्याचीं एक पद्धतशीर मोहीम काही मंडळींकडून सुरू झाली. सदर कायद्याविषयी या पुस्तिकेच्या माध्यमातून सर्वसामान्यांना उपयुक्त अशी माहिती प्राप्त झाली. या पुस्तिकेचे सर्व स्तरांवर स्वागत झाले.

६.२. सांस्कृतिक राष्ट्रवाद के शिल्पी

भारतीय जनता पार्टीचे माजी अध्यक्ष व विद्यमान गृहमंत्री अमित शाह यांनी आर्य चाणक्य, बंकिमचंद्र चटर्जी, वीर सावरकर, डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी आणि पं. दीनदयाळ उपाध्याय या महापुरूषांवर देशभरात गेल्या दोन-तीन वर्षात विविध ठिकाणी भाषणे दिली. या भाषणांमधून वरील महापुरूषांनी मांडलेल्या सांस्कृतिक राष्ट्रवादाविषयी अमित शाह यांनी अधिक प्रकाश टाकला. या भाषणातील काही मुद्यांचे संकलन व संपादन करून प्रबोधिनीच्यावतीने ही पुस्तिका तयार करण्यात आली.

भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचे हस्ते दि. ४ ऑगस्ट २०१९ रोजी "सांस्कृतिक राष्ट्रवाद के शिल्पी" या पुस्तिकेचे प्रकाशन नवी दिल्ली येथील खासदारांसाठी योजलेल्या कार्यशाळेमध्ये करण्यात आले. या कार्यक्रमात भाजपा, अध्यक्ष, जगत प्रकाश नड्डा आणि प्रबोधिनीचे उपाध्यक्ष विनय सहस्रबुद्धे देखील उपस्थित होते.

७. आर. एम. पी. इंटरनॅशनल (आंतरराष्ट्रीय कक्ष) :

प्रबोधिनीचा हा आंतरराष्ट्रीय कक्ष २००२ पासून कार्यरत आहे. या कक्षाच्या वतीने आंतरराष्ट्रीय स्तरावरील विशेषतः लोकशाही असणाऱ्या देशांतील संस्थांशी संपर्क जाळे विकसित करणे, संयुक्तपणे कार्यक्रमांचे आयोजन करणे, आदि उपक्रम हाती घेतले जातात.

७.१. संयुक्त राष्ट्रसंघाच्या उच्चस्तरीय राजकीय बैठकीत सहभाग :

प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे व कार्यकारी प्रमुख (प्रशासन व प्रकल्प) रवी पोखरणा हे दि. ११ ते १७ जुलै २०१९ या कालावधीत अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात त्यांनी अमेरिकेतील काही संस्थांबरोबर संयुक्तरित्या कार्यक्रम योजण्या संदर्भात काही संस्था प्रमुखांच्या भेटी घेतल्या. या मान्यवरांत न्यूयॉर्कमध्ये सयुंक्त राष्ट्रसंघातील भारताचे कायम प्रतिनिधी असलेले तत्कालीन अधिकारी सईद अकबरुद्दीन, वॉशिंग्टनच्या राष्ट्रीय लोकशाही संस्थेचे आशिया खंडाचे संचालक मनप्रीत सिंग आनंद, आंतरराष्ट्रीय रिपब्लिकन संस्थेचे व्ही. शिवराम आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या सामाजिक-आर्थिक विभागातील सामाजिक विभागप्रमुख मार्क आंद्रे यांना ते भेटले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या उच्चस्तरीय राजकीय बैठकीतही या दोघांनी सहभाग घेतला. प्रबोधिनीचे संयुक्त राष्ट्रसंघातील प्रतिनिधी बाला बालगुरु हे ही यावेळी उपस्थित होते.

इन्स्टिट्यूट ऑफ इनक्लूझिव्ह गव्हर्नन्स (आय्. आय्.जी.एच्.), हैद्राबाद

डिसेंबर २०१७ पासून प्रबोधिनीच्या माध्यमातून आय्. आय्.जी.एच्.चे काम सुरु झाले. अहवाल वर्षात या संस्थेच्या वतीने १० सप्टेंबर २०२० रोजी विश्व आत्महत्या प्रतिबंध दिवसाचे निमित्त साधून एक परिसंवाद आयोजित करण्यात आला. उस्मानिया विद्यापीठा बरोबर हैद्राबाद येथे झालेल्या परिसंवादाचा "विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि आत्महत्या प्रतिबंध" हा विषय होता.

या परिसंवादात एकूण १४२ प्रतिनिधींनी सहभाग घेतला. डॉ.मीना हरिहरन, डॉ.सी.वीरेंदर, प्रा.वाय्.एल् श्रीनिवास, डॉ.शैलजा, जे.कृष्णा, डॉ.प्रवीण चिंतापटी, राजेंद्र तपाडिया इ. मान्यवरांनी याप्रसंगी आपले विचार मांडले. प्रो.पी.मुरली मनोहर यांनी परिसंवादाचा समारोप केला.

८. संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र, पुणे

म्हाळगी प्रबोधिनीचे पुणे येथील संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र गेल्या १२ वर्षांपासून काम करत आहे. स्वाती महाळंक या केंद्राच्या सध्या कार्यकारी प्रमुख म्हणून कार्यभार सांभाळत आहे. या केंद्रातर्फे मुख्यत्वे शैक्षणिक परिवारातील घटकांसाठी तसेच समाजातील अन्य क्षेत्रातील घटकांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने आयोजित करण्यात येतात. व्यक्तिगत क्षमता संवर्धन, त्यातून कार्यक्षमता वृद्धी व नेतृत्व विकास आणि त्याद्वारे संस्थात्मक विकासाला हातभार अशी चतुःसूत्री आधारभूत मानून प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

नेतृत्व अध्ययन केंद्रातर्फे २०१९-२०२० या आर्थिक वर्षात एकूण दहा कार्यक्रम झाले. कालानुरूप समोर येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी समाजातील घटकांना सक्षम करणे, त्यासाठी क्षेत्रानुसार आवश्यक असणाऱ्या नव्या तंत्रज्ञानाची ओळख करून देणे आणि त्यासाठीचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून सामाजिक विकास प्रक्रियेला गती देणे यासाठी प्रबोधिनीचे पुणे केंद्र सातत्याने प्रयत्नशील असून केंद्रातर्फे त्यासाठी नवनवीन विषय हाताळले जातात.

गेल्या वर्षात मोबाईल फोनच्या आधारे डिजिटल शैक्षणिक साहित्य निर्मिती आणि शिक्षण आणि रोजगार निर्मिती यांचा परस्परसंबंध या विषयांवरील कार्यशाळा असे दोन वैशिष्टपूर्ण कार्यक्रम झाले.

या केंद्रातर्फे अहवाल वर्षात योजण्यात आलेल्या कार्यक्रमांची माहिती पुढील प्रमाणे.

८.१. शिक्षक क्षमता विकास कार्यक्रम :

८.१.१. काकडे महाविद्यालय, शेवगाव :

नेतृत्व अध्ययन केंद्रातर्फे शेवगाव येथे नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळाच्या चार शाळांमधील अध्यापकांसाठी दि. १५-१६ एप्रिल २०१९ रोजी क्षमता विकास कार्यक्रम पार पडला. संस्थेच्या आबासाहेब काकडे महाविद्यालयाच्या संकुलामध्ये आयोजित या कार्यशाळेत ७२ अध्यापक सहभागी झाले होते. भूमिका सापेक्ष व्यक्तिमत्त्व विकास, नियोजन कौशल्य, कार्यसंस्कृती आदी विषयांवर डॉ. सुधाकर शेलार, दर्शन धामणकर, डॉ. दीपक गुप्ते, स्वाती महाळंक आदींनी मार्गदर्शन केले. वेगाने बदलत्या काळात शिक्षकांच्या नव्या जबाबदाऱ्या, विद्यार्थ्यांची बदलती मानसिकता आणि त्यानुरूप शिक्षकांप्रमाणेच आवश्यक ठरणारी समुपदेशकाची भूमिका समजण्यास या कार्यशाळेचा मोठा हातभार लागल्याचे यावेळी अनेक सहभागी शिक्षकांनी समारोप सत्रात सांगितले.

८.१.२. पेरीविंकल इंग्लिश मिडियम स्कूल, पुणे :

पुण्यातील बावधन येथील चैतन्य विद्या प्रतिष्ठानच्या पेरीविंकल इंग्लिश मिडियम स्कूलच्या शिक्षकांसाठी याच संस्थेमध्ये एक दिवसीय कार्यशाळा दि. ८ जून २०१९ रोजी आयोजित करण्यात आली. त्यामध्ये संस्थेच्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विभागात अध्यापन करणाऱ्या ४३ शिक्षिका सहभागी झाल्या होत्या, संस्थेचे

अध्यक्ष राजेंद्र बांदल, मुख्याध्यापिका रोहिणी कुळहळळी यावेळी उपस्थित होते. प्रा. शरद सुंकर, डॉ. श्रुती पानसे, सविता काजरेकर, स्वाती महाळंक आदींनी यावेळी मार्गदर्शन केले. कार्यसंस्कृतीसारखा नवा आणि महत्त्वपूर्ण विषय यामुळे अवगत झाल्याबद्दल सहभागींनी आनंद व्यक्त केला.

८.१.३. शिक्षण आणि रोजगार निर्मिती :

शिक्षण आणि रोजगार निर्मिती या वेगळ्या पण महत्त्वाच्या विषयावर संस्थेच्या सभागृहात एक दिवसीय कार्यशाळा दि. १५ डिसेंबर २०१९ रोजी पार पडली. शिक्षक, प्राध्यापक, शैक्षणिक समुपदेशक अशा क्षेत्रातील २५ जण त्या कार्यशाळेत सहभागी झाले होते. करियर म्हणजे काय, रोजगार क्षमतेचा विकास, प्रत्यक्ष रोजगार निर्मिती, त्यासाठीच्या नव्या संधी, आवश्यक मानसिक परिवर्तन, नव्याने विकसित झालेली-होणारी क्षेत्रे इत्यादी अनेक कळीच्या मुद्द्यांवर प्रा. चारुदत्त निमकर आणि डॉ. दीपक परबत यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यशाळेचा समारोप लिज्जत पापड उद्योगसमूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश कोते यांच्या उपस्थितीत झाला. महिला सक्षमीकरणाच्या हेतूने सात महिलांपासून सुरु झालेल्या आणि आज देशभरात ५० हजारांपेक्षा जास्त महिला कार्यरत असलेल्या या उद्योगसमूहाची वाटचाल कथन करतानाच "रोजगारासाठी शिक्षणाबरोबरच व्यवहारज्ञानही हवे, निष्ठा, सचोटी आणि अथक परिश्रमांची तयारीही हवी, अशा युक्तीच्या चार गोष्टी" कोते यांनी सहभागींना सांगितल्या. सध्याच्या काळात बेरोजगारीचे प्रमाण मोठे असताना रोजगाराचे नवे पर्याय कुठले, ते कसे शोधावेत, याविषयी अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन कार्यशाळेमुळे मिळाले, अशी प्रतिक्रिया सहभागी प्रा. संजय पत्की यांनी व्यक्त केली तर " नवे मार्ग चोखाळताना सर्वात मोठा अडसर ठरणारी व्यक्तीची मानसिकता कशी बदलावी, त्यासाठी उपलब्ध असलेले शास्त्रीय मार्ग, स्वतःची बलस्थाने आणि त्रुटी यांचे नेमके विश्लेषण ही यशाची गुरुकिल्ली ठरू शकणारी माहिती कार्यशाळेमध्ये मिळाली" असे गौरवोद्गार डॉ. रसूल जमादार यांनी काढले.

८.२ नेतृत्व विकास कार्यक्रम :

८.२.१. केंद्राच्या वतीने अहवाल वर्षात नेतृत्व विकास या विषयाचे एकूण तीन कार्यक्रम झाले. त्यापैकी दोन पुणे येथे व एक सोलापूर येथे योजण्यात आला.

दि. १-२ जून २०१९ रोजी व्यक्तिगत विकासाच्या माध्यमातून नेतृत्व विकासाच्या विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकणाऱ्या या कार्यशाळेमध्ये पुणे आणि परिसरातील इच्छुकांसह बीड, नांदेड, औरंगाबाद, सातारा, कोल्हापूर, सांगली आदी भागातील लोकही उत्साहाने सहभागी झाले होते. महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, अधीक्षक, सी. ए., पत्रकार, उद्योजक, इतर नोकरदार, राजकीय कार्यकर्ते, समुपदेशक, होतकरू विद्यार्थी असा ३९ जणांचा त्यामध्ये समावेश होता. व्यक्तिमत्त्व विकास, सर्जनशीलता, संवाद कौशल्य, ध्येयनिश्चिती अशा अनेक पैलूंवर यावेळी प्रा. प्रसन्न रबडे, अनया निसळ, डॉ. दीपक गुप्ते, दर्शन धामणकर, प्रा. शरद सुंकर आदींनी मार्गदर्शन केले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या कार्यशाळेत सहभागींकडून अनेक प्रात्यक्षिके करून घेण्यात आली.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनी सहभागींशी संवाद साधला. आपल्या आवडीचा एखादा विषय निश्चित करून त्याचा सखोल अभ्यास केला पाहिजे आणि आपला व्यासंग वाढविला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

समारोपाला ज्येष्ठ गिर्यारोहक, एव्हरेस्टवीर उमेश झिरपे उपस्थित होते. गिर्यारोहण मोहिमांवर जातांना असलेली पर्यावरणाची परिस्थिती, प्रतिकूल हवामान, सहकाऱ्यांची मानसिक स्थिती, पणाला लागणारी निर्णयक्षमता आणि हे सांभाळत पुढे जाताना लागणारा नेतृत्वाचा कस अशा अनेक बाबींवर त्यांनी स्वानुभवकथनातून प्रकाश टाकला. सहभागी व्यक्तींनी कार्यशाळेच्या संयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. " व्यक्तिमत्त्वाच्या इतक्या विविध पैलूंकडे आजपर्यंत कधी गांभीर्याने बघितलेच नव्हते. स्वतःकडे पाहण्याची नवी दृष्टी या कार्यक्रमामुळे मिळाली, " असे मनोगत बीडच्या प्रमोद पुसरेकर यांनी समारोप प्रसंगी व्यक्त केले. तर " समाज बदलण्याचा, देश घडविण्याचा विचार करताना आधी स्वतःची मनोभूमिका निश्चित आणि ठाम केली पाहिजे, " हे यामधून उमगले, असे सातारा येथील प्रसाद कुलकर्णी यांनी सांगितले.

८.२.२. अशाच प्रकारचा एक कार्यक्रम दि. २२-२३ फेब्रुवारी २०१९ रोजी पुण्यातच काही कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार करण्यात आला. यात पाच जिल्ह्यातून २५ जण सहभागी झाले होते. त्यामध्ये प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते, नोकरदार आणि विद्यार्थ्यांचा समावेश होता. स्वयंविश्लेषण, व्यक्तिमत्त्व विकास, संवाद कौशल्य, नियोजन, निर्णयक्षमता इत्यादी विषयांवर यशोधरा भालेराव, प्रा. अमेय देशपांडे, प्रा. स्वप्नील टेंभुर्णे, दर्शन धामणकर, प्रा. शरद सुंकर आदी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. " या कार्यशाळेतील मार्गदर्शनामुळे कामाची नेमकी दिशा काय असावी, त्याचे नियोजन कसे करावे हे समजण्यास मदत झाली " असे मत सहभागी डॉ. दत्ता पाटील यांनी व्यक्त केले. तर "सामूहिक उपक्रम राबविताना सर्वांना सांभाळून घेऊन पुढे कसे जावे, कसे बोलावे याचे ज्ञान या दोन दिवसात मिळाले" असे ओंकार भागवत या तरुण कार्यकर्त्याने सांगितले.

८.२.३ वैष्णवी महिला उन्नती संस्था, सांगोला :

नेतृत्व अध्ययन केंद्र आणि सांगोला येथील वैष्णवी महिला उन्नती संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सांगोला येथे दि.१६ जून २०१९ रोजी सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांसाठी नेतृत्व विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूर जिल्हा किसान मोर्चाचे अध्यक्ष शिवाजीराव गायकवाड यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. सामाजिक क्षेत्रात वावरताना कार्यकर्त्यांचे संवाद कौशल्य, जनसंपर्क, सामाजिक जाणीव आणि तरुणांसाठी उद्योजकतेच्या नव्या संधी इत्यादी विषयांवर दर्शन धामणकर, सूर्यकांत माडे, स्वाती महाळंक यांनी संवाद साधला. संस्थेच्या अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्या राजश्री नागणे पाटील यांच्या पुढाकाराने झालेल्या या कार्यशाळेमध्ये तालुक्यातील १४० कार्यकर्ते सहभागी झाले होते.

८.३. उद्योजकता विकास कार्यक्रम, सांगोला

नेतृत्व अध्ययन केंद्रातर्फे सांगोला येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आय. टी. आय) विद्यार्थ्यांसाठी दि.१७ जून २०१९ उद्योजकता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सांगोला येथील वैष्णवी महिला उन्नती संस्थेच्या पुढाकाराने आयोजित या एक दिवसीय कार्यशाळेत ८० विद्यार्थी सहभागी झाले होते. सोलापूर जिल्हा भाजपाचे प्रमुख मोहनदादा डांगरे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. प्रदीप हरिदास यावेळी उपस्थित होते. उद्योजकता म्हणजे काय, त्यासाठी आवश्यक गुण, संस्थेतील शिक्षणाद्वारे उपलब्ध होणाऱ्या उद्योजकतेच्या नव्या संधी, ध्येयनिश्चिती इत्यादी विषयांवर सूर्यकांत माडे, दर्शन धामणकर, स्वाती महाळंक यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा त्यांनी रोजगार मिळवण्यासाठी कसा उपयोग करावा, याचबरोबर केवळ चाकरी करणारे नोकरदार न होता अनेकांना रोजगार देणारे उद्योजक कसे व्हावे, याचे नेमके मार्गदर्शन या कार्यशाळेमधून मिळाले, म्हणूनच विद्यार्थ्यांना उद्योजकता विकासासाठी प्रेरित करणारा प्रबोधिनीचा हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे " अशा शब्दात प्राचार्य हरिदास यांनी प्रबोधिनीची प्रशंसा केली.

८.४. डिजिटल शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यक्रम :

शिक्षणाचा सर्वदूर प्रसार आणि त्याचा अधिक परिणामकारक उपयोग यासाठी अत्याधुनिक डिजिटल माध्यमांचा वापर करण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार शैक्षणिक साहित्यही डिजिटल माध्यमातून तयार करण्यासाठी हे तंत्रज्ञान शिक्षक-प्राध्यापक वर्गापर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन नेतृत्व अध्ययन केंद्रातर्फे कॅमेऱ्यासारखे महागडे साहित्य न वापरता, आपल्या रोजच्या अँड्रॉईड मोबाईल फोनच्या आधारे डिजिटल शैक्षणिक साहित्य निर्मिती, या अभिनव विषयावरील तीन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

८.४.१. डिजिटल शैक्षणिक साहित्य निर्मिती – बॅच १, पुणे

दि.२७-२८ जुलै २०१९ रोजी या पहिल्याच कार्यशाळेमध्ये पुण्यासह मुंबई, बंगळूरू, अहमदनगर, सातारा, औरंगाबाद, नवी मुंबई, कोल्हापूर, सोलापूर इत्यादी ठिकाणचे ४२ जण सहभागी झाले होते. या विषयातील तज्ज्ञ भूषण कुलकर्णी आणि एकनाथ कोरे यांनी कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत संगणक तसेच मोबाईल फोनवरील ध्वनिमुद्रणाची तंत्रे, स्पेशल इफेक्ट्स, कॅमेऱ्यासमोरील प्रभावी सादरीकरण, व्हिडीओ शूटिंग, यूट्यूब अकौंट इत्यादी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेत सर्व सहभागींना प्रात्यक्षिके पाहतानाच स्वतः प्रत्यक्ष करून पाहण्याची संधी मिळाल्याने तंत्र अवगत करणे सुलभ झाले. बालचित्रवाणीचे निर्माते ज्योतिराम कदम यांनी समारोप केला. तंत्रज्ञान आत्ता इतके पुढारलेले नसतानाही बालचित्रवाणीमध्ये केलेले प्रयोग सांगतानाच, त्याचा खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचविण्यासाठी किती आणि कसा उपयोग झाला, ग्रामपंचायतीच्या एकुलत्या एका कृष्णधवल दूरचित्रवाणी संचावर कार्यक्रम बघत काही पिढ्या कशा घडल्या, हा डिजिटल शैक्षणिक प्रसाराचा मोठा प्रवास त्यांनी आपल्या कथनातून उलगडून दाखविला. सहभागींनी या तंत्राचा आज कसा वापर करावा, याचेही उपयुक्त मार्गदर्शन केले. " या कार्यशाळेमुळे हाती जादूची कांडी गवसली असून आता काहीही नवे प्रयोग करणे शक्य होणार आहे " अशी आत्मविश्वासपूर्ण प्रतिक्रिया अनेक सहभागींनी व्यक्त केली.

८.४.२. डिजिटल शैक्षणिक साहित्य निर्मिती – बॅच २, पुणे

पहिल्या बॅचला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर इच्छुक शिक्षकांच्या मागणीनुसार तातडीने पुढील आठवड्यात दि.३-४ ऑगस्ट २०१९ रोजी या दुसऱ्या बॅचचे आयोजन करण्यात आले. पुण्यात त्यावेळी सतत जोरदार पाऊस आणि त्यामुळे पूरपरिस्थिती निर्माण झालेली असतानाही या कार्यशाळेला पुणे, मुंबईसह नाशिक, धुळे, मराठवाड्यातील आणि विदर्भातील विविध जिल्हे, गडचिरोलीसारख्या दुर्गम भागांमधूनही ७० प्रतिनिधी उपस्थित होते. नागपूरमधील महाविद्यालयाच्या बारा प्राध्यापिकांचा गट तर सातत्याने पाठपुरावा करून सहभागी झाला.
पहिल्या कार्यशाळेतील तंत्रांबरोबरच यावेळी श्राव्य ध्वनिमुद्रण आणि दृश्य चित्रीकरण यांचे एकत्रीकरण, (ऑडिओ — व्हिज्युअल मिक्सिंग) त्याला पार्श्वसंगीताची जोड देणे, निवेदनाचे स्वतंत्र ध्वनिमुद्रण करून त्याचा दृष्यानुरूप वापर करणे, पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन तयार करणे, स्वत:चा यूट्यूब चॅनेल सुरु करणे, त्यावर व्हिडीओ अपलोड करणे इत्यादी नवीन तंत्रे शिकविण्यात आली. सहभागींना ही तंत्र कौशल्ये वापरून स्वतंत्र व्हिडीओ चित्रित करण्याचा गृहपाठ दिला होता. सर्व सहभागींनी प्रतिभेचा उत्तम उपयोग करून सुंदर व्हिडीओ तयार केले. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीचे निवृत्त निर्माते, बालचित्रवाणीचे संचालक अरुण काकतकर यांच्या हस्ते समारोप झाला. त्यांनी आपल्या कारकीर्दीत अशी तंत्र कौशल्ये वापरून तयार केलेले काही दुर्मिळ माहितीपट यावेळी दाखविले. सहभागींनी तयार केलेले व्हिडीओ बघून त्यावर काही टिप्पणी आणि मौलिक सूचनाही केल्या.

८.४.३. कीर्ती महाविद्यालय, मुंबई

या मालिकेतील तिसरा कार्यक्रम प्रबोधिनीच्या ज्ञान-नैपुण्य केंद्राच्या संकुलात मुंबईच्या कीर्ती एम. डुंगरसी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दि.११-१२ जानेवारी २०२० आयोजित करण्यात आला होता. मुंबई आणि परिसरातील शैक्षणिक क्षेत्रातील ७५ जण त्यामध्ये सहभागी झाले होते. प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांच्या हस्ते आणि कीर्ती कॉलेजचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय पवार, उपप्राचार्य डॉ. सीमा पुरोहित यांच्या उपस्थितीत पार पडले. प्रबोधिनीचे कार्यकारी प्रमुख (प्रशासन आणि प्रकल्प) रवी पोखरणा यांनी कार्यशाळेतील प्रतिनिधींनी प्रबोधिनीचे विविध उपक्रम, त्यामध्ये सहभागी होण्यासाठीचे मार्ग याबाबत माहिती दिली.

पहिल्या दोन कार्यशाळांमधील घटकांबरोबरच दृकश्राव्य चित्रीकरणाचे मोबाईलवर आणि संगणकावर संकलन आणि संपादन, चित्रीकरणासाठी क्रोमा तंत्रज्ञानाचा वापर, आवाजाचे स्पेशल इफेक्ट्स, चित्रीकरणामध्ये प्रकाशाचे स्पेशल इफेक्ट्स इत्यादी नवीन तंत्रे शिकविण्यात आली.

ज्येष्ठ अभिनेते सचिन खेडेकर, अभिनेते प्रमोद पवार, दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीच्या ज्येष्ठ वृत्तनिवेदिका शिबानी जोशी आदी मान्यवरांनी कार्यशाळेला भेट देऊन प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला. आज डिजिटल माध्यमांमुळे भाषा, प्रांत, प्रदेश ओलांडून कोणतेही काम लोकांपर्यंत पोहोचते आहे, असे सांगत काळाची गरज ओळखून या अभिनव तंत्र प्रशिक्षणाची कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल सचिन खेडेकर यांनी प्रबोधिनीच्या या उपक्रमाची प्रशंसा केली. स्वच्छ, शुद्ध मराठी कसे बोलावे याविषयी प्रमोद पवार यांनी मार्गदर्शन केले. तर कार्यशाळेतील प्रात्यक्षिक म्हणून

शिबानी जोशी यांची स्वाती महाळंक यांनी मुलाखत घेतली. या तीनही भेटींचे प्रशिक्षणार्थींनी मोबाईलवर चित्रिकरण केले आणि नंतर त्याचे संपादनही केले. त्यानंतर कार्यानुभव म्हणून ज्ञान-नैपुण्य केंद्रातील विविध विभागांचे चित्रीकरण आणि त्याचे संपादन करून प्रबोधिनीवर चार मिनिटांचा माहितीपट तयार करण्यात आला.

समारोपाला न्यूज-१८ लोकमतचे महेश म्हात्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर तंत्रज्ञानाच्या वाढत्या वेगाशी जमवून घेणे हे आव्हान असून ते पेलण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा हे यशस्वी पाऊल म्हणावे लागेल. तंत्रज्ञानाच्या वाढत्या गैरवापराला आळा घालण्यासाठीही त्याचा अधिकाधिक सकारात्मक वापर व्हायला हवा, असे प्रतिपादन म्हात्रे यांनी केलं. प्राचार्य डॉ. दत्तात्रय पवार, उपप्राचार्य डॉ. सीमा पुरोहित, सुनीलदत्त कुलकर्णी, हर्षद भोसले आदींनी सहभागी म्हणून आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. या तंत्रज्ञानाचा उपयोग करून आपल्या कामात लक्षणीय बदल आणि सुधारणा घडवून आणणे शक्य आहे, असे मत अनेक प्रशिक्षणार्थींनी यावेळी व्यक्त केले.

वरील कार्यक्रमाव्यतिरिक्त या केंद्रांच्या माध्यमातून योजण्यात आलेले अन्य कार्यक्रम पुढीलप्रमाणे :

८.५. डाळिंब उत्पादकांशी चर्चा बैठक :

सांगोला (जिल्हा सोलापूर) येथील क्लस्टर निर्मितीसाठी उत्सुक असलेल्या डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांची बैठक – दि.६ जुलै २०१९ रोजी नेतृत्व अध्ययन केंद्राच्या पुढाकाराने आणि प्रबोधिनीच्या अटल प्रतिभा पोषण केंद्राच्या माध्यमातून पुण्यात केंद्राच्या म्हाळगी सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यामध्ये १५ डाळिंब उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते. त्यांना या प्रकल्पांची माहिती देण्यात आली. शेतकरी-उत्पादक कंपनीची उपयुक्तता यावेळी सांगण्यात आली. अटल प्रतिभा पोषण केंद्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी उदय वान्कावाला,
डॉ. अमित टूटेजा, सूर्यकांत माडे, स्वाती महाळंक, पल्लवी रामाणे यांनी मार्गदर्शन केले.

८.६. स्ट्राईड प्रकल्प बैठक :

श्री छत्रपती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, विवेक व्यासपीठ आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने "विकासाच्या मार्गावरील भारतीय अर्थव्यवस्थेबाबत आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी विशेष योजना" (स्किम फॉर ट्रान्स-डिसिप्लीनरी रिसर्च फॉर इंडियाज डेव्हलपिंग इकॉनॉमीज स्ट्राईड) या प्रकल्पाचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करण्यासाठी विचारविनिमय करण्याकरिता पुण्यात दि. ८ नोव्हेंबर २०१९ रोजी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी विद्यापीठाच्या १५ प्राध्यापक सदस्यांसह विवेक व्यासपीठचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर, पत्रकार अरविंद गोखले, संजय तांबट, गणेश राऊत, स्वाती महाळंक यावेळी उपस्थित होते.

९. दिल्ली कार्यालय :

२०११ पासून राजधानी दिल्लीत प्रबोधिनीने आपले कार्यालय सुरु केले. या कार्यालयाच्या माध्यमातून विविध उपक्रमांबरोबरच दिल्लीत केंद्र शासनाचे विविध विभाग, संस्था व अधिकाऱ्यांशी जनसंपर्क ठेवण्याचे काम नियमितपणे चालू आहे. अहवाल वर्षात या कार्यालयाच्या पुढाकाराने योजण्यात आलेले कार्यक्रम पुढीलप्रमाणे -

९.१. खासदारांचे आदर्श कार्यालय व जनसंपर्क :

खासदारांचे आदर्श कार्यालय व जनसंपर्क या विषयावर २६ जून २०१९ रोजी एक कार्यशाळा दिल्ली येथे योजण्यात आली होती. मे, २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत प्रथमच निवडून आलेल्या खासदारांसाठी या कार्यशाळेची योजना होती. एकूण ८७ खासदारांनी यात सहभाग घेतला. नवसारी, गुजरात येथील नवसारीचे प्रतिनिधीत्व करणारे व १७ व्या लोकसभा निवडणुकीत संपूर्ण देशात विक्रमी मताधिक्याने विजयी झालेले भाजपाचे खासदार सी. आर. पाटील यांनी सहभागींना मार्गदशन केले. प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खा. डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी सत्राचे अध्यक्षस्थान भूषविले.

९.२. नवभारत : नागरी आव्हाने

प्रबोधिनी आणि विश्व संसाधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने "नवभारत : नागरी आव्हाने" या विषयावर केवळ राज्यसभेतील खासदारांसाठी ११ जुलै २०१९ रोजी एक संवादसत्र योजण्यात आले होते. या संवादसत्राची भूमिका डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी मांडली तर विषयाची मांडणी विश्व संसाधन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ओ. पी. अगरवाल यांनी केली. चर्चात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्रात खासदारांनी सूचनाही केल्या, आणि आपले अभिप्रायही मोकळेपणाने मांडले. यांस १० खासदार उपस्थित होते.

९.३. परिवर्तनशील भारत संवाद :

परिवर्तनशील भारत संवाद हा कार्यक्रम दिल्ली कार्यालयामार्फत होत असतो. २०१५ पासून हा कार्यक्रम नियमितपणे योजण्यात येत आहे.

या शृंखलेतील दहावा कार्यक्रम कॉन्स्टिट्यूशन क्लब येथे ५ सप्टेंबर २०१९ रोजी झाला. यांत केंद्रीय कृषी राज्यमंत्री पुरुषोत्तम रुपाला यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रामुख्याने कृषी मंत्रालयातर्फे होणारे नावीन्यपूर्ण प्रयोग व योजना तसेच त्यातून होणारी उपलब्धी या अनुषंगाने या सत्राची रचना करण्यात आली होती. केंद्र सरकारची शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याबाबतची वचनबद्धता त्यांनी उपस्थितांसमोर मांडली. सेंद्रिय शेती, कडुनिंबमिश्रीत युरिया अशा विविध माध्यमातून केंद्र सरकार करत असलेल्या कामाची माहिती त्यांनी सर्वांसमोर ठेवली. भारत मिळालेल्या संधीचा उपयोग करत सेंद्रिय उत्पादन क्षेत्रात घेत असलेली भरारी किंबहुना अव्वल स्थानी पोहोचण्याच्या दृष्टीने करत असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी सांगितली. विद्यार्थी, संशोधक, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते असे कृषी क्षेत्राशी संबंधित १२० प्रतिनिधी या व्याख्यानास उपस्थित होते.

९.४ नैतिक नेतृत्व विकास कार्यक्रम :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि राष्ट्रीय मनुष्यबळ विकास संस्था (एन.एच.आर.डी नेटवर्क) यांच्या संयुक्त विद्यमाने गोवा येथे ३ ते ७ नोव्हेंबर २०१९ या दरम्यान सार्वजनिक उद्योग क्षेत्रातील कंपन्यांसाठी नैतिक नेतृत्व विकास कार्यक्रम योजण्यात आला होता.

या वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाद्वारे चर्चात्मक पद्धतीने व सखोल चिंतनातून औद्योगिक संस्थांमधून (कंपन्या) योग्य परिवर्तन करु शकणारे सक्षम नेतृत्व तयार व्हावे हा उद्देश आहे. उद्योग क्षेत्रात काम करताना समोर येणाऱ्या नैतिकतेबाबतच्या विविध पैलूंचे निराकरण करुन घेणे, तसेच नेमकी उत्तरे शोधण्यासाठी या नैतिक तत्वांचा उपयोग करणे या दृष्टीने या कार्यक्रमाची रचना करण्यात आली होती. गेल्या वर्षीपासून अशा कार्यक्रमाची सुरुवात झाली होती. प्रथम कार्यक्रम श्रीनगर येथे झाला होता.

राष्ट्रीय मनुष्यबळ विकास संस्थेचे महासंचालक धनंजय सिंग या कार्यक्रमाचे समन्वयक होते. त्यांनी प्रारंभी प्रास्ताविक केले. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनीही उद्घाटन सत्रात आपले विचार मांडले.

या पाच दिवसीय कार्यक्रमात एअरपोर्ट अॅथॉरिटी ऑफ इंडिया, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि, सेंट्रल टूल रुम व प्रशिक्षण केंद्र, हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., गॅस अॅथॉरिटी ऑफ इंडिया लि., इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. अशा विविध सार्वजनिक सेवा उद्योगातील २८ प्रतिनिधी सहभागी झाले होते. यामध्ये विविध सत्रांमधून एच. सी. एल. चे प्रमुख सल्लागार आर. आनंद, व्यवस्थापन तज्ज्ञ डॉ. स्वप्ना पाटकर, गोव्याचे ज्येष्ठ पोलीस अधिकारी राजेशकुमार, लेखिका व योगशिक्षिका ईरा त्रिवेदी आदी तज्ज्ञ व्यक्तींनी सहभागींना मार्गदर्शन केले.



१०. भारतीय लोकशाही नेतृत्व संस्था (आय.आय.डी.एल)

प्रबोधिनीच्या भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थेच्या वतीने योजण्यात येणाऱ्या नेतृत्व, राजकारण आणि सु-शासन विषयावरील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे हे तिसरे वर्ष.

१०.१. आय. आय. डी. एल. सल्लागार मंडळ बैठक

प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली आय. आय. डी. एल. च्या सल्लागार मार्गदर्शन मंडळाची बैठक दि.३० एप्रिल २०१९ रोजी दिल्ली येथे योजण्यात आली होती. या बैठकीत एकूण आठ सदस्य उपस्थित होते. समुद्रगुप्त कश्यप, डॉ. हिमांशू रॉय, डॉ. राधाकृष्णन् पिल्लाई, डॉ. जगदीश जाधव, रवींद्र साठे, रवी पोखरणा आणि अभ्यासक्रम समन्वयक देवेंद्र पै या बैठकीस उपस्थित होते. देवेंद्र पै यांनी उपस्थितांसमोर अभ्यासक्रमाबाबत निवेदन केले. यांत द्वितीय तुकडीच्या वर्षभरातील कामगिरीचा आढावा घेण्यात आला व पुढील वर्षीच्या तुकडीच्या कार्यवाहीबाबत सर्व मुद्यांची चर्चा करण्यात आली.

१०.२. दीक्षांत समारंभ २०१८-१९

आय. आय. डी. एल. च्या द्वितीय तुकडीतील (२०१८-१९) विद्यार्थ्यांचा दीक्षांत समारंभ २० मे २०१९ रोजी दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये योजण्यात आला होता. १८ पैकी १६ विद्यार्थी या दीक्षांत समारंभाला उपस्थित होते. भारताच्या संरक्षणमंत्री निर्मला सीतारामन् या मुख्य पाहुण्या होत्या, तर विशेष पाहुणे होते ऑर्गनायझर साप्ताहिकाचे संपादक प्रफुल्ल केतकर. प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे या दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. विविध क्षेत्रातील सुमारे ३०० नामवंत प्रतिनिधी या दीक्षांत समारंभास उपस्थित होते. प्रबोधिनीचे महासंचालक व अभ्यासक्रमाचे विभाग प्रमुख रवींद्र साठे यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले तर अभ्यासक्रमाचे उपविभाग प्रमुख रवी पोखरणा यांनी शेवटी आभार मानले.

१०.३. तिसऱ्या तुकडीचा शुभारंभ

यंदाच्या वर्षी एकूण १२ राज्यातील २६ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. या अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या तुकडीचा शुभारंभ २ ऑगस्ट २०१९ रोजी महाराष्ट्र विधानसभेचे तत्कालीन सभापती, हरिभाऊ बागडे यांच्या मुख्य उपस्थितीत झाला. या प्रसंगी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु, सुहास पेडणेकर तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु, प्रा. इ. वायुनंदन हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

या पाठ्यक्रमात नेतृत्व व व्यवस्थापन, राजकारण व लोकशाही आणि सुशासन या विषयांवर एकूण ४५६ सत्रे झाली. यामध्ये एकूण १७४ तज्ज्ञांचे मार्गदर्शन केले. त्यातील काही मान्यवर वक्ते पुढील प्रमाणे –

जे.पी.नडडा अध्यक्ष, भाजपा	गीता जैन आमदार	रवी गांधी, महासंचालक, सीमा सुरक्षा दल
बी.एल.संतोष, राष्ट्रीय संघटन महामंत्री, भाजपा	नरेंद्र मेहता, माजी आमदार	आभास मालदाहीयार, लेखक
व्ही.सतीश, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री, भाजपा	नील सोमय्या, नगरसेवक, मुंबई	पाशा पटेल, शेतकरी नेते
राम नाईक, माजी राज्यपाल, उत्तरप्रदेश	प्रफुल केतकर, संपादक, ऑर्गनायझर	कॅप्टन (निवृत्त) स्मिता गायकवाड
पुरुषोत्तम रुपाला, केंद्रीय मंत्री, भारत सरकार	सुकृत खांडेकर, संपादक, नवशक्ती	रुबेन मस्खारनेस, राष्ट्रीय सहसचिव, आम आदमी पार्टी
मनसुख मांडवीय, केंद्रीय मंत्री, भारत सरकार	वासुदेव कामत, (विख्यात चित्रकार) अध्यक्ष, संस्कार भारती	राधाकृष्ण पिल्लाई, लेखक
फग्गनसिंह कुलस्ते केंद्रीय मंत्री, भारत सरकार	निर्मोद कलमार, डेप्युटी काउन्सेल जनरल, इस्त्रायेल, मुंबई	मयांक गांधी, माजी नेता, आम आदमी पार्टी
अर्जुन मुंडा, माजी मुख्यमंत्री, झारखंड	सुमंत आमशेकर, प्रांत प्रचारक, रा.स्व.संघ	शंतनू गुप्ता, लेखक
अरविंद धर्मापुरी, खासदार, निजामाबाद	रतन शारदा, लेखक	भूषण गोखले, निवृत्त हवाईदल प्रमुख
सय्यद जफर इस्लाम, राष्ट्रीय प्रवक्ते, भाजपा	शक्ती बक्षी, कार्यकारी संपादक, कमल संदेश	सुनील साठे, मुख्य कार्यकारी अधिकारी, टी.जे.एस.बी.बँक
माधव भांडारी मुख्य प्रवक्ता, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र	डॉ.हरीष शेट्टी, प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ	कमलप्रीत कौर माजी अध्यक्ष, मुंबई महिला काँग्रेस

१०.४. क्षेत्र भेटी : सहभागी प्रतिनिधींनी मुंबई व आसपासच्या परिसरातील काही शासकीय व सामाजिक संस्था, संघटनांना भेट दिली व त्यांच्या कामकाजाची माहिती करून घेतली. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

केशव सृष्टी	खासदार गोपाळ शेट्टी यांचा मतदार संघ (उत्तर मुंबई) भेट
उत्तन पोलीस स्टेशन	जवाहरलाल नेहरू बंदर, उरण
ग्लोबल पॅगोडा	चित्रनगरी, मुंबई
कान्हेरी गुम्फा, नॅशनल पार्क, बोरिवली	प्रेरणा संस्थेचे बालसंगोपन केंद्र आणि वारांगना क्षेत्र
मुंबई उच्च न्यायालय	समतोल फाऊन्डेशनचे पुनर्वसन शिबिर, ठाणे
केशवजी नाईक चाळ, गिरगाव, मुंबई	पुंनसारीगावं, अहमदाबाद
खा.सी.आर.पाटील यांचे कार्यालय (वापी)	स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक, दादर
चैत्यभूमी, दादर	काळाघोडा कला प्रदर्शन
धारावी झोपडपट्टी, मुंबई	रिपब्लिक स्टुडीओ, परळ
मूक-बधिर विद्यालय प्रगती प्रतिष्ठान – जव्हार	राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, प्रांत कार्यालय, परळ, मुंबई
जव्हार वनवासी क्षेत्र भेट	अभाविप केंद्र कार्यालय, माटुंगा, मुंबई

१०.५. आदर्श संयुक्त राष्ट्र महासभा आणि भारतीय संसद

या पाठयक्रमाचा एक भाग म्हणून सहभागी प्रतिनिधींचे दि.१४ व १६ डिसेंबर २०१९ रोजी भारतीय संसद व दि.३ फेब्रुवारी २०२० रोजी संयुक्त राष्ट्र महासंघाची महासभा या दोन्हींच्या अभिरूप सभांचे प्रात्यक्षिक योजण्यात आले होते. संयुक्त राष्ट्र संघ महासभेच्या अध्यक्षस्थानी मंगोलियाचे राजदूत गनबोल्ड गॉनचिग होते तर उपाध्यक्ष म्हणून इटलीच्या मुंबईतील वकिलाती उपप्रमुख स्टेफानिया कॉस्टॅन्झा होते. या महासभेत अमेरिका-इराण तणाव व सुरक्षा परिषदेने या संदर्भात योजण्यात येणाऱ्या उपाययोजनांची चर्चा करण्यात आली. भारतीय संसदेच्या अभिरूप सभेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन नगरविकासमंत्री योगेश सागर व खा. गोपाळ शेट्टी होते. संसद कामकाजाची रुपरेषा योग्य पद्धतीने तयार करण्यात आली होती. यामध्ये प्रश्नोत्तराचा तास, सरकारी नियंत्रणातून हिंदू देवस्थाने मुक्त करणे, महिलांसंदर्भात होणाऱ्या गुन्ह्यांवर ठराव व विधेयक, अंदाजपत्रक (अर्थसंकल्प) आणि समान नागरी कायदा विधेयक अशा विषयांचा अंतर्भाव होता.

१०.६. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक

ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका झाल्या. या निमित्ताने विद्यार्थ्यांचे ४-५ जणांचे गट करुन त्यांना उमेदवारांबरोबर काम करण्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. या विद्यार्थ्यांनी अतुल भातखळकर, मनीषा चौधरी, पराग अळवणी, नरेंद्र मेहता आणि अमीत साटम या पाच उमेदवारांबरोबर संपूर्ण निवडणूक काळात कामाचा

अनुभव घेतला. निवडणुकीच्या दोन आठवडे आधी या विद्यार्थ्यांनी सर्वेक्षण, घरोघरी प्रचार, चौक सभा नियोजन, संकलित माहितीचे विश्लेषण, धोरण आखणी, समाजमाध्यम इ. गोष्टीत प्रत्यक्ष सहभागी होण्याचा अनुभव घेतला.

१०.७. राष्ट्रीय राजधानी अभ्यास सहल

मार्च २०२० मध्ये झालेल्या या अभ्यास सहलीत दिल्लीतील महत्त्वाच्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. यात राष्ट्रपती भवनाचाही समावेश होता. या भेटी दरम्यान विविध प्रशासकीय प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, राजकीय नेत्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद करण्यात आला. ज्या मान्यवरांच्या भेटी घेतल्या त्या अशा :

१) व्यंकय्या नायडू, उपराष्ट्रपती
२) जितेंद्र सिंग – केंद्रीय राज्यमंत्री, प्रधानमंत्री कार्यालय
३) नरेंद्रसिंग तोमर – केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामविकास व पंचायतराज मंत्री
४) प्रकाश जावडेकर – केंद्रीय पर्यावरण, वन आणि माहिती व प्रसारण मंत्री
५) स्मृती ईराणी – केंद्रीय मंत्री, महिला व बालविकास
६) महिंद्रनाथ पांडे – केंद्रीय मंत्री, कौशल्य विकास आणि उद्योजकता
७) मनसुख मांडविया – केंद्रीय नौकानयन राज्यमंत्री

१०.८. अन्य विशेष

१०.८.१ या अभ्यासक्रमास २०१९-२० पासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची पदविका अभ्यासक्रम म्हणून मान्यता मिळाली आहे.

१०.८.२ अभ्यासक्रमातील नेहमीच्या विषयांव्यतिरिक्त अन्य काही विषयांवर विद्यार्थ्यांसाठी सत्र घेण्यात आली व काही उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्याचा तपशील पुढील प्रमाणे.

- दि. १९-२२ ऑगस्ट २०१९ रोजी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या श्रेयस मेहता यांनी "तणावमुक्ती नव्हे तर आनंदी जीवन" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- जागतिक हिंदू आर्थिक परिषद यंदा मुंबईत ग्रँड हयात या ठिकाणी दि. २७-२९ सप्टेंबर २०१९ येथे झाली. आजवर या परिषदेत आर्थिक क्षेत्रातील तज्ज्ञ, धोरण निश्चित करणारे उद्योजक असे विविध प्रतिनिधी सहभागी होत आले आहेत. यंदाच्या परिषदेत आय. आय. डी. एल. च्या विद्यार्थ्यांनी केवळ सहभाग घेतला नाही, तर परिषदेच्या यशस्वितेसाठी आवश्यक असणारी सर्व कामे करण्याचा अनुभवही घेतला व या परिषदेचे वृत्तसंकलनही केले.

• दिल्ली येथील कनेक्टिंग ड्रीम्स या संस्थेने आय. आय. डी. एल. च्या विद्यार्थ्यांना समाजातील प्रश्नांची जाणीव उत्पन व्हावी याकरिता एक सर्वेक्षण प्रकल्प योजण्यात आला होता. यासाठी दि.३० सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०१९ त्यांचे पाच गट पाडण्यात आले व उत्तन परिसरातील गावात जाऊन या गटांनी तेथील समस्या जाणून घेतल्या. गावकऱ्यांच्या भेटी घेतल्या आणि त्या समस्या सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील याबद्दलची प्रत्येक गटाने गटाशः सादरीकरण केले.

• प्रबोधिनीच्या वतीने दि.१८-१९ जानेवारी २०२० रोजी झालेल्या " एकल उपयोग प्लास्टिक निर्मूलन : नवभारतासाठी शक्यता व संधी " या राष्ट्रीय परिषदेत विद्यार्थ्यांनी विविध कामांची जबाबदारी स्वीकारुन परिषद यशस्वी होण्यास सहयोग दिला.

• विकास यात्रा - गुजरात राज्यातील विविध विकास कामांचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांनी दि. २३-२४ जानेवारी २०२० रोजी दोन दिवसांचा गुजरात दौरा केला. या दौऱ्यात पन्सारी हे आदर्श गाव, प्राणी वसतीगृह, साबर डेअरी, राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा डॅशबोर्ड, साबरमती नदी संदर्भातील कार्य, बस वाहतूक व्यवस्थेचा नियंत्रण कक्ष अशा विविध कामांना विद्यार्थ्यांनी भेटी देऊन ती कामे समजून घेण्याचा प्रयत्न केला.

• नागरिकता सुधारणा कायद्याच्या समर्थनार्थ मुंबईत दि. १९ डिसेंबर २०१९ रोजी झालेल्या सभेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. माध्यमांनीही या सहभागाला मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी दिली.

११. ज्ञान-नैपुण्य केंद्र :

प्रबोधिनीचे केशव सृष्टी, भाईंदर (प.) येथील ज्ञान-नैपुण्य केंद्र गेल्या अनेक वर्षांपासून व्यावसायिक संस्थांच्या अंतर्गत कार्यक्रमासाठीचे मुख्य स्थान ठरले आहे. १५ एकरच्या निसर्गरम्य परिसरात निवासी प्रशिक्षणासाठीच्या वा तत्सम उपक्रमांसाठीच्या अद्ययावत रचना येथे उपलब्ध आहेत. याचबरोबर महत्त्वाच्या बैठकांसाठी, अंतर्गत प्रशिक्षणासाठी वा तत्सम उपक्रमांसाठी सुयोग्य स्थान अशी व्यावसायिक जगतातली ज्ञान-नैपुण्य केंद्राची ओळख होत चालली आहे. त्यामुळेच प्रतिवर्षी व्यावसायिक व सामाजिक संघटनांकडून या स्थानाचा विविध उपक्रमांसाठी उपयोग करण्याचे प्रमाणही वाढताना दिसत आहे. अहवाल वर्षात ज्या प्रमुख संस्थांनी संकुलाचा वापर केला त्या पुढीलप्रमाणे -

व्यावसायिक संस्था : टाटा कॅपिटल फायनान्शियल सर्विस लि., फ्युचर शार्प स्किल लि., एडलवाईज टोकिओ लाईफ इन्शुरन्स कं. लि., पीडिलाईट इंडस्ट्रीज लि., इमा-पीजी इंडिया प्रा. लि., एल. एन्ड. टी इलेक्ट्रीकल एन्ड ऑटोमेशन लि., पितांबरी लि.

शैक्षणिक संस्था : मुंबई एज्युकेशन ट्रस्ट, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे, सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आदर्श कॉलेज, एस. के. सोमय्या कॉलेज, नॅशनल कन्नडा एज्यूकेशन सोसायटी.

सामाजिक संस्था : यु. एन्ड आय. ट्रस्ट, स्नेहा फाऊंडेशन, पिरामल फाऊंडेशन, अमेरिकेअर्स फाऊंडेशन, सेवा इंटरनॅशनल, सॅटर्डे क्लब, रुम टू रिड, सेंटर फॉर इंटरनेट एन्ड सोसायटी, भारतीय स्त्री शक्ती.

११.१. कर्मचारी प्रशिक्षण :

प्रबोधिनीच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी बुधवार दि ८ मे २०१९ रोजी समूह बांधणी व परस्पर संबंध या विषयावर प्रबोधिनीचे महासंचालक, रवींद्र साठे यांनी प्रबोधिनीच्या उत्तन येथील संकुलात प्रशिक्षण घेतले. यामध्ये एकूण ४५ कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. त्यात ५ महिला व ४० पुरूष सहभागी झाले होते. या प्रशिक्षणात दैनंदिन काम करत असताना, सर्वांनी एकमेकांना कसे सहकार्य करावे तसेच एकमेकांशी चांगल्या प्रकारचे संबंध कशा प्रकारे प्रस्थापित करता येतील, या विषयावर त्यांनी आपले विचार मांडले. विविध खेळांच्या माध्यमातून त्यांनी विषय अधिक रंजक केला. वर्षभरात आणखी काही सत्रे झाली ती पुढीलप्रमाणे -

क्र.	दिनांक	विषय	मार्गदर्शक	संख्या
१	२५.०७.२०१९	सिनर्जी आणि टीम वर्क	नील वऱ्हाडपांडे	२६
२	२४.१०.२०१९	वर्क लाईफ बॅलन्स – १	गीतांजली लेले	१२
३	१३.११.२०१९	वर्क लाईफ बॅलन्स – २	गीतांजली लेले	१२
४	२३.१२.२०१९	अवर गिफ़्टेड पॉवर	अरविंद रेगे	१६
५	०२.०१.२०२०	बिझनेस प्रोसेस स्टडी	अरविंद रेगे	१६

आदरांजली..

प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे माजी सदस्य व पद्मश्री डॉ. सदाशिव वसंत गोरक्षकर यांचे दि. १३ जुलै २०१९ रोजी निधन झाले. वस्तू संग्रहालय व कला विषयातील ते प्रसिध्द व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम आणि छत्रपती शिवाजी महाराज वस्तूसंग्रहालय अशा नावाजलेल्या वस्तूसंग्रहालयाच्या विकासात मोठे योगदान दिले.

राज भवन्स इन महाराष्ट्र, ॲनिमल्स इन इंडियन आर्ट, कार्ले केव्हस् ऑफ वेस्टर्न इंडिया अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. भारतातील गुप्तकालीन शिल्पकलेवरही त्यांनी लेखन केले. प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीच्या वतीने दि.२४ सप्टेंबर २०१९ च्या बैठकीत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात दिली.

१२. अटल प्रतिभा पोषण केंद्र

दि.२० जानेवारी २०१८ रोजी नीती आयोगाच्या सहकार्याने अटल प्रतिभा पोषण केंद्र, प्रबोधिनीच्या भाईंदर येथील प्रशिक्षण संकुलात सुरु करण्यात आले. तेव्हा पासून हे केंद्र कार्यान्वित आहे. या केंद्राचे मंगलप्रभात लोढा, सईद जाफर, किरीट भन्साळी, रवींद्र साठे, जयमृग हे संचालक आहेत. तर रवी पोखरणा हे मुख्य सल्लागार असून उदय वांकावला हे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून या केंद्राचे काम पाहतात. या केंद्रामार्फत अहवाल वर्षात खालील कार्यक्रम झाले.

१२.१. तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या बैठकी आणि स्टार्ट अप निवड प्रक्रिया :

अटल प्रतिभा पोषण केंद्राने विविध क्षेत्रांतील सखोल अभ्यास आणि अनुभव असणाऱ्या १५ हून अधिक तज्ज्ञ, उद्योजक, प्राध्यापक आणि गुंतवणूकदार यांच्याशी स्वतःला जोडून घेतलेले आहे. या सर्वांचे मार्गदर्शन वेळोवेळी केंद्रातील नवोदित उद्यमशील स्टार्टअप्सना लाभत असते. केंद्राने ४ मे २०१९ तसेच १० ऑगस्ट २०१९ या तारखांना दोन बैठकी आयोजित केल्या होत्या. यामध्ये प्रत्येकी १५ मार्गदर्शकांनी भाग घेतला होता. या दोन्ही प्रसंगात मिळून विविध पैलूंवर झालेल्या चर्चेतून मार्गदर्शकांनी केंद्राच्या जडणघडणीतही मोलाचा वाटा उचलला आहे. शिवाय केंद्राने २०१९ या वर्षात १० ऑगस्ट, ६ व २१ सप्टेंबर आणि २३ नोव्हेंबर यादिवशी ३० हून अधिक स्टार्ट अप उद्यमींना निवडप्रक्रियेतील अंतिम परीक्षणासाठी बोलावले होते. या निवडप्रक्रियेतही या मार्गदर्शक तज्ज्ञांचा मोठा सहभाग राहिला.

१२.२. न्यू इंडिया स्टार्ट अप कॉन्क्लेव :

न्यू इंडिया स्टार्ट अप कॉन्क्लेव हे व्यासपीठ कृषी, माहिती-तंत्रज्ञान, शिक्षण व आरोग्य, आणि सामाजिक उपक्रम या क्षेत्रांत काम करणाऱ्या निवडक स्टार्ट अप्सचे व्यासपीठ आहे. या माध्यमातून नव्या स्टार्ट अप्सना आपापल्या व्यवसायाचे सादरीकरण, या क्षेत्रातले तज्ज्ञ, गुंतवणूकदार, संबंधित विभागांचे सरकारी अधिकारी, ज्येष्ठ मार्गदर्शक तसेच विषयाची रुची असणारे विद्यार्थी यांचेसमोर करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते.

१२.२.१ या परिषदेच्या प्रथम आवृत्तीचा उद्घाटन सोहळा केंद्रीय कृषि व किसान कल्याण राज्य मंत्री, पुरूषोत्तम रुपाला यांचे हस्ते दि. २२ जून २०१९ रोजी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या भाईंदर येथील ज्ञान-नैपुण्य केंद्रात पार पडला. याप्रसंगी अटल इन्होवेशन मिशन-नीती आयोगाचे मिशन डायरेक्टर, आर. रमणन, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे मिलिंद कांबळे आणि मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर डिंपल मेहता आदी मान्यवर उपस्थित होते. या परिषदेत कनेक्ट, शेअर आणि गो या त्रिसूत्रीवर आधारित तीन समांतर सत्रे झाली. वेगवेगळ्या नव उद्यमीनी यावेळी आपापली सादरीकरणे केली. मानव संसाधन विकास मंत्रालयातील चीफ इन्होवेशन ऑफिसर डॉ. अभय जेरे (माहिती संचार तंत्रज्ञान), बी. व्ही. जी. ग्रुपचे अध्यक्ष हणमंत गायकवाड (कृषि) आणि दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे संस्थापक, मिलिंद कांबळे (सामाजिक उपक्रम) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्रांमध्ये १० पेक्षा अधिक तज्ज्ञांनी मूल्यांकन एकूण १५० प्रतिनिधीनीं या परिषदेत आपला सहभाग नोंदवला.

१२.२.२ दि. ८ फेब्रुवारी २०२० रोजी लोअर परेल येथील वर्ल्ड टॉवर्स मधील 'क्लब डब्ल्यू' येथे शृंखलेतील दुसरी परिषद झाली. या परिषदेचे उद्घाटन गोल्डमन सॅक्सचे व्यवस्थापकीय संचालक व तरुण उद्योजक अमित राजे यांनी केले. यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष संतोष मंडलेचा हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री डॉ. महेंद्रनाथ पांडये यांनी या परिषदेचा समारोप केला. या परिषदेस विविध क्षेत्रांतील १७५ जण उपस्थित होते. ग्रासरुट टेक्नोलॉजीचा वापर करुन आकांक्षी जिल्हयांमध्ये (Aspirational Districts) परिवर्तन घडवण्यात योगदान देणाऱ्या सात उद्योजकांना हे व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले.

या परिषदेसाठी भागीदार म्हणून मॅथ वर्क, महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर, आय. आय. टी. मद्रास आणि कानपूरचे इन्होवेशन आणि स्टार्ट अप इनक्युबेशन केंद्र यासारख्या नामांकित संस्थांनी सहकार्य केले. "आकांक्षी जिल्हयासाठी कार्यरत स्टार्ट अप्स समोरील आव्हाने आणि संधी" या विषयावरील आयोजित विशेष चर्चासत्राचे अध्यक्ष पद नीती आयोगाचे वरिष्ठ सल्लागार रामा कामाराजू यांनी भूषविले तर महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमल, महाराष्ट्र राज्याच्या पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक आणि उप-सचिव अभय महाजन, राष्ट्रीय आरोग्य मिशनचे डॉ.विजय कांदेवाड यांनी देखील मार्गदर्शन केले, सोबतच अनुभवकथनही केले. त्याचबरोबर महाराष्ट्राचे कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाचे आयुक्त दीपेंद्र कुशवाह यांनी देखील उपस्थितांशी संवाद साधत त्यांचे मनोबल वाढवले. आकांक्षी जिल्हयांमध्ये (Aspirational Districts) परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने स्टार्ट अप संबंधित भागीदारांच्या बरोबर विचारांची देवाणघेवाण आणि व्यवसायातील सहयोग यावर देखील या परिषदेत सविस्तर चर्चा झाली.

१२.३. कृषी संवेदना :

कृषी क्षेत्रात बदल घडवू इच्छिणाऱ्या स्टार्टअप उद्योजकांना, ग्रामीण उपजीविका वृध्दिंगत करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या उद्यमींना आणि प्रगतिशील शेतकऱ्यांना अनुभवात्मक शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने प्रबोधिनीच्या अटल इनक्युबेशन सेंटरने 'कृषी संवेदना' हा नवा उपक्रम हाती घेतला आहे. या निमित्ताने कृषी क्षेत्रातील १२ जणांना दि. २० जुलै २०१९ रोजी नेरळ (कर्जत) जवळील 'सगुणा बाग' येथे चंद्रशेखर भडसावळे या प्रतिथयश कृषी उद्योजकाशी संवाद साधण्याची संधी देण्यात आली. कृषी पर्यटन, शेतीमधील प्रगत तंत्रज्ञान, वणवा विझवण्याचे अनोखे तंत्र अशा विविध विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले, तसेच त्यांनी आपला जीवन प्रवास आणि संघर्ष देखील थोडक्यात उलगडून दाखवला. याप्रसंगी भडसावळे यांनी शोधून काढलेले भातशेतीमधील नवे तंत्र वापरुन भरभराटीस आलेल्या एका स्थानिक शेतकऱ्याला देखील आपला अनुभव व्यक्त करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

१२.४. अभिमुखता कार्यक्रम (Bootcamp)

दि. ४ आणि ५ ऑक्टोबर २०१९ रोजी आयोजित केलेल्या अभिमुखता कार्यक्रमात (Bootcamp) निवड प्रक्रियेतून पुढे आलेल्या बारा स्टार्ट अप्सच्या प्रथम गटाला केंद्राच्या इन्क्युबेशन कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आले. हे स्टार्टअप्स मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, जव्हार, नाशिक, कोल्हापूर आणि बंगलोर या शहरांतले असून त्यांच्या तंत्रज्ञानाधिष्ठित व्यवसायांचा प्रभाव मात्र देशव्यापी आहे. या उद्योजकांच्या वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी तसेच भगेरिया इंडस्ट्रीजचे प्रमुख, सुरेश भगेरिया उपस्थित होते.

पर्यटनातून रोजगार निर्मिती करुन आदिवासी भागातून होणारे स्थलांतर थांबवणे, रंगकामासारख्या पारंपरिक व्यवसायात नवे तंत्र आणून कामगारांना संघटित करणे, कौशल्य विकासातून महिलांचे सबलीकरण करणे आणि त्यांचा व्यवसायात सहभाग वाढवणे, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती क्षेत्राची पुनर्उभारणी करणे, उपलब्ध तंत्रयुक्त साधने व सुविधा खेडोपाडी पोहोचवणे, नवनवीन संशोधनांची माहिती उपलब्ध करुन देऊन वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींची क्षमता बांधणी करणे, वैभवशाली परंपरा असलेले पण लोप पावत चाललेले कलाकुसरीचे व्यवसाय आणि कारागीर यांच्या सक्षमीकरणासाठी नावीन्यपूर्ण पद्धतीने तंत्रज्ञानाचा वापर करणे, आपत्ती व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अचूक विश्लेषण करणे अशा विविध विषयांवर काम करणाऱ्या स्टार्ट अप्सचा समावेश या गटात आहे.

१२.५. कार्यशाळा आणि प्रशिक्षण शिबिरे :

अटल प्रतिभा पोषण केंद्राच्या 'इन्क्युबेशन' कार्यक्रमाचा भाग असणाऱ्या स्टार्ट अप्ससाठी दर महिन्याला व्यवसाय वृध्दीशी निगडित विविध विषयांवर कार्यशाळा किंवा निवासी प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातात. यावर्षी ८,९ नोव्हेंबर २०१९ रोजी शिवकुमार वलादी यांनी 'विपणन शास्त्र', १८, १९ डिसेंबर २०१९ ला डॉ. कौस्तुभ धारगळकर यांनी ' बिझिनेस मॉडल कॅनव्हास ' तर २० जानेवारी २०२० ला विभोर गर्ग यांनी ' सोशल मीडिया ' या विषयांवरील कार्यशाळांमध्ये मार्गदर्शन केले. स्टार्ट अप उद्योजकांपुढील आव्हाने लक्षात घेऊन चर्चात्मक पध्दतीने आयोजित केलेल्या या शिबिरांत प्रत्येकी जवळपास १५ स्टार्ट अप्स सहभागी झाले. तसेच उद्योजकतेचे बीज कॉलेजमधील विद्यार्थ्यात रुजवावे या उद्देशाने मुंबईमधील प्राध्यापकांसाठी २ ते ६ डिसेंबरच्या दरम्यान एक प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. पार्ले टिळक मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या इन्क्युबेशन सेन्टरमध्ये संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या शिबिरात १९ महाविद्यालयांतील मधील ३१ प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग घेतला. यावेळी उदय वान्कावाला, डॉ. राधा अय्यर, डॉ. हसीना सय्यद, डॉ. प्रेमा बसर्गेकर आणि डॉ. राखी शर्मा मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

१२.६. इतर कार्यक्रम - सोशल इम्पॅक्ट चॅलेंज :

अटल प्रतिभा पोषण केंद्राने दिल्लीमधील 'कनेक्टिंग ड्रीम्स फाऊंडेशन' च्या सोबतीने 'सोशल इम्पॅक्ट चॅलेंज' हा एक सामाजिक उपक्रम यावर्षी प्रथमच मुंबईतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला. दि. ३० आणि ३१ ऑगस्ट २०१९ रोजी आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबिराने या उपक्रमाची सुरूवात झाली. यामध्ये मुंबईतील ९

महाविद्यालयांचे ७५ विद्यार्थी तसेच पालघर जिल्हयातील ३० लघुउद्योजक सहभागी झाले होते. उद्घाटन सत्रात मीरा-भाईंदर महापालिकेचे तत्कालीन आयुक्त, बाळाजी खतगावकर आणि समारोप सत्रात विपुल पंड्या (संचालक, आर.ए.सी.) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रत्यक्ष अनुभवातून उद्योजकतेचा अनुभव मिळावा यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील १०० तास लघुउद्योजकांसाठी काम करुन त्यांचे उत्पन्न वाढविण्यास मदत करणे हे उद्देश विद्यार्थांसमोर ठेवण्यात आले आहे.

१२.७. यूथ को लॅब :

युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (UNDP) आणि अटल इनोव्हेशन मिशन-नीती आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने 'यूथ को लॅब' चॅलेंज २०१९-२० चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १६ डिसेंबर २०१९ रोजी पार पडलेल्या उपांत्यपूर्व फेरीचे यजमानपद हे अटल प्रतिभा पोषण केंद्राकडे होते. यामध्ये पश्चिम भारतातील २० स्टार्ट अप गटांतील ३० उद्योजक सहभागी झाले होते

प्रबोधिनीची व्यवस्थापन समिती व वार्षिक सर्वसाधारण सभा यांच्या बैठका खालीलप्रमाणे झाल्या.

क्र.	बैठकीचे नाव	दिनांक	स्थान	उपस्थिती
१	व्यवस्थापन समिती	२४ सप्टेंबर २०१९	ज्ञान-नैपुण्य केंद्र, भाईंदर	७
२	व्यवस्थापन समिती	१ नोव्हेंबर २०१९	चंचल कार्यालय, मुंबई	८
३.	व्यवस्थापन समिती	१८ जानेवारी २०२०	ज्ञान-नैपुण्य केंद्र, भाईंदर	६
४.	वार्षिक सर्वसाधारण सभा	२४ सप्टेंबर २०१९	ज्ञान-नैपुण्य केंद्र, भाईंदर	१६

मुखपृष्ठ :

१. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह भय्याजी जोशी, वनवासी खासदारांसाठी योजलेल्या चर्चा सत्रात समारोप करताना. शेजारी डॉ. गजानन डांगे व केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा व रवींद्र साठे.

२. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, प्रबोधिनी आणि मणिपाल विद्यापीठाच्या संयुक्त पाठ्यवृत्ती माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करताना. सोबत व्ही.सतीश, पुरुषोत्तम रुपाला, रवींद्र साठे, जफर इक्बाल, मणिपाल विद्यापीठाचे सोमनाथ दास, किरीट भन्साळी, हेमंत गोयल व रवी पोखरणा.

मलपृष्ठ :

१." एकल प्लास्टिक निर्मूलन " या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत बोलताना महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी. शेजारी डॉ.विनय सहस्रबुद्धे, निरंजन हिरानंदानी व रेखा महाजन.

२. उपराष्ट्रपतीभवनात आय.आय.डी.एल.च्या तृतीय तुकडीच्या विद्यार्थ्यांसमवेत भारताचे उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू.

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

एक दृष्टीक्षेप

स्थापना : १९ ऑक्टोबर १९८२

हेतू : सामाजिक व राजकीय क्षेत्रांत स्वयंसेवी वृत्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षणाची व प्रबोधनाची रचना उत्पन्न करणे.

- **विविध उपक्रम :**

  प्रशिक्षण वर्ग, कार्यशाळा, दिशादर्शन शिबिरे यांचे आयोजन.

  वैचारिक उपक्रम :

  चर्चासत्रे, परिसंवाद, व्याख्यानमाला, अभ्यासमंडळे, पुस्तक प्रकाशन.

  संशोधनपर व सक्षम पाहणी प्रकल्प.

- **विविध कक्ष :**

- **संदर्भ, माहिती आणि प्रलेखन केंद्र – १९९०**

  देश-विदेशांतील वृत्तपत्रे, मासिके व नियतकालिके यांमधून ३५ निवडक विषयांवर अभ्यासनीय व संदर्भ असलेला मजकूर कात्रण स्वरूपात पाठविणारी पाक्षिक सेवा.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय – १९९३**

  सुमारे १६,४३३ ग्रंथ ३,६०० संदर्भ पुस्तिका, सामाजिक व राजकीय विषयांवरील ७०० ध्वनिफिती व चित्रफिती २२७ व ७५० सीडींचा दृक-श्राव्य विभाग.

- **मानव अधिकार अध्ययन व जाणीव जागृती केंद्र – २००२**

  मानवाधिकार संकल्पनेचा एतद्देशीय संदर्भातून सर्वंकष विचार करण्यासाठी, प्रशिक्षणाचे व जागरणाचे व्यासपीठ.

- **आर. एम. पी. इंटरनॅशनल (आंतरराष्ट्रीय कक्ष) – २००२**

  संस्कृती स्नेहबंधातून आंतरराष्ट्रीय सामंजस्य हे मुख्य सूत्र धरून काम करणारा मंच.

- **विलासराव साळुंखे अध्यासन – २००३**

  पाणी आणि अन्य नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनाच्या विषयात संशोधन, प्रलेखन व प्रशिक्षण घडवून आणणारे व्यासपीठ.

- **संस्था बांधणी व नेतृत्व अध्ययन केंद्र – २००८**

  निकोप संस्थाजीवन व वैज्ञानिक पद्धतींची संघटनात्मक रचना यांसाठी निर्माण झालेली उपक्रमांची शृंखला मुख्यतः शिक्षण व सहकार क्षेत्रातील संस्थांचा सहयोग.

- **नेतृत्व विकास केंद्र दिल्ली – २०१०**

  सर्वसामान्य नागरिकांपासून ते व्यावसायिक जीवनात नेतृत्व करणाऱ्यापर्यंत सर्वांसाठी व्यावहारिक नेतृत्वाचे धडे देणारा कक्ष.

- **भारतीय लोकशाही नेतृत्व संस्था (आय. आय. डी. एल.) – २०१७**

  पदव्युत्तर विद्यार्थांसाठी नेतृत्व, राजकारण आणि सुशासन या विषयावरील अभ्यासक्रम.

व्यवस्थापन समिती

प्रा. अनिरुद्ध देशपांडे	अध्यक्ष
डॉ. विनय सहस्रबुद्धे	उपाध्यक्ष
मंगल प्रभात लोढा	सचिव
प्रताप (भाई) आशर	कोषाध्यक्ष
अनुप अग्रवाला	सदस्य
विजय (भाई) गिरकर	सदस्य
रेखा महाजन	सदस्या
अरविंद रेगे	सदस्य
व्ही. सतीश	सदस्य

अधिकारी गण

रवींद्र साठे	महासंचालक
रवी पोखरणा	कार्यकारी प्रमुख (प्रशासन आणि प्रकल्प)
उमेश मोरे	मुख्य व्यवस्थापक (देखभाल)

Society Registration Act (Registration No. 618 Bom. /82)
Trust Act (Registration No. F-7863 Bom. /82)
80-G Certificate No. DIT (E) / ITO (Tech) / 80-G / 1450/ 2009-10 (Valid from 01.04.2010)
● FCRA No. 083780667 ● PAN No.: AAATR3174J
● TAN No.: MUMR16886C ● GST No.: 27AAATR3174J1ZA

मुंबई कार्यालय
१७, चंचल स्मृती, गं.द.आंबेकर मार्ग,
श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट समोर, वडाळा,
मुंबई – ४०० ०३१, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २४१३ ६९६६ /
२४१८ ५५०२ / २४१५ ६७२५
ई मेल -rmpchanchal@rmponweb.org

ज्ञान–नैपुण्य केंद्र (प्रशिक्षण संकुल)
केशव सृष्टी, उत्तन, एस्सेल वर्ल्ड रोड, भाईंदर (पश्चिम)
जि. ठाणे – ४०१ १०६, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २२ – २८४५ ०१०१ / २ / ३ / ६
ई मेल -samparka@rmponweb.org

दिल्ली कार्यालय
१३६ नॉर्थ एव्हेन्यू, नवी दिल्ली – ११००११
दूरध्वनी : +९१ – ११ – २३०९ २०३२
ई मेल -rmpdelhi@rmponweb.org

पुणे कार्यालय
६२६, नारायण पेठ, लोखंडे तालीम शेजारी,
पुणे – ४११ ०३०, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ – २० – २४४७ ३२७१
ई मेल -cibls@rmponweb.org

आमची उपलब्ध प्रकाशने


प्रकाशनाचे नाव	लेखक	किंमत
संघटनशास्त्र (पाचवी आवृत्ती)	संपादन : डॉ. विनय सहस्रबुद्धे	१००.००
नागरिकत्व सुधारणा कायदा – २०१९ : भ्रम आणि वास्तव	अतुल भातखळकर	१०.००
समीक्षा संचित (निवडक इंग्रजी ग्रंथांच्या परीक्षणांचे संकलन)	लेखक : ज.द.जोगळेकर संपादन : रवींद्र साठे	३००.००
डाव्यांची ढोंगबाजी : भ्रष्टाचार,हिंसाचार आणि दंडुकेशाही	माधव भांडारी	७५.००
आयसिसचा उद्रेक आणि त्याचे महाराष्ट्रावरील परिणाम	मधुबन पिंगळे	६०.००
बाळासाहेब देवरस : कर्तृत्व आणि विचार	भय्याजी जोशी यांच्या भाषणावर आधारित	२५.००
भारतीय जनता पार्टी राजकारणात कशासाठी ? (आवृत्ती : मराठी / हिंदी / इंग्रजी)	अमित शाह	२५.००
गोदापरिक्रमेची फलश्रुती : धरणातील पाण्याचे व्यवस्थापन आणि पूरनियंत्रण	विलासराव साळुंखे अध्यासन	३०.००
लोकनीतीचे उपासक : लोकनायक जयप्रकाश	मिलिंद बोकील	२०.००
राजनीति के उस पार (चतुर्थ आवृत्ती)	संपादन : सुधीर नादगांवकर	१५०.००
संगठन कौशल (द्वितीय आवृत्ती)	संपादन : डॉ.विनय सहस्रबुद्धे	१५०.००
सांस्कृतिक राष्ट्रवाद के शिल्पी	अमित शाह	६०.००
Al-Qaeda (Global Terror Incorporated)	Sudhakar Raje	५०.००
Left Front Rule in West Bengal (Genesis Growth And Decay)	Dr. Ashok Modak Atul Bhatkhalkar	४०.००
Development and Internal Security in Chattisgarh: Impact of Naxalite Movement	-	३०.००
Creativity in Cooperation (Four Success Stories)	Niranjan Welankar Ravi Pokharna	४०.००
War On Terrorism (A Compilation of Seminar Papers)	Editor: Ravindra Sathe Milind Arolkar	३०.००
Understanding Human Computer: System And Software	Arvind Bhaskar Rege	१२०.००
Including The Excluded (A Study of the Impact of Contract Labour Act 1970)	S.M.Dharap	१५०.००
The National Cause	S.G.Majgaonkar	२००.००



केंद्रीय मंत्री डॉ.महेंद्रनाथ पांडे स्टार्ट-अप परिषदेचा समारोप करताना. सोबत आ.मंगल प्रभात लोढा, संतोष मंडलेचा

अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू अरुणाचलच्या आमदारांच्या प्रशिक्षण वर्गात बोलताना. शेजारी भाजपाचे महामंत्री राम माधव व खासदार तापीर गांव





भाजपा संघटन महामंत्री बी.एल. संतोष, नेतृत्व साधनाच्या प्रतिनिधींना मार्गदर्शन करताना. शेजारी डॉ.विनय सहस्रबुद्धे रवींद्र साठे व रवी पोखरणा





samparka@rmponweb.org www.rmponweb.org www.knowledgeexcellencecentre.com
f/rmponweb.org @rmponweb rmponweb